रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८८ ▌अंक १३६ ▌पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

www.krushival.in


# कृषीवल

रायगड, सोमवार, दि. १४ ऑक्टोबर २०२४

किंमत ४ ₹







## जर्मनीत दुसऱ्या महायुद्धातील बॉम्ब सापडला

**जर्मन :** जर्मनीच्या हॅम्बर्ग प्रांतात दुसऱ्या महायुद्धातील एक बॉम्ब सापडला आहे. शनिवारी स्टर्नशांजे जिल्ह्यात बॉम्ब असल्याची माहिती मिळाल्यानंतर ३०० मीटरच्या परिघात राहणाऱ्या सुमारे ५ हजार लोकांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले. याशिवाय पोलिसांनी परिसरातील रेस्टॉरंट आणि बारही बंद केले होते. पोलिस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्राथमिक शाळेच्या बांधकामादरम्यान तो सापडला. बॉम्ब सुरक्षितपणे निकामी करण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. तो डिफ्यूज करायला अर्धा तास लागला. बॉम्ब सापडल्याने जिल्ह्यातील रेल्वे सेवाही बंद ठेवावी लागली.



● (छायाचित्र : समीर मालोदे)

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**
**स्वखर्चाने अलिबाग-रोहा रस्ता करेन, असे स्वप्न विद्यमान लोकप्रतिनिधींनी दाखविले. अनेकवेळा नारळ फोडण्याचा शुभारंभ केला. सोशल मिडियावर तो व्हिडीओ आजही व्हायरल होत आहे. परंतु त्यांनी नागरिकांची घोर निराशा केली आहे. अलिबाग-रोहा रस्ता खड्ड्यात गेला आहे. विकासाच्या नावाखाली मते मिळविली. आता निवडणुका जवळ आल्यावर भूमीपूजनाचा तडाखा सुरु केला आहे. सर्वसामान्यांना स्वप्न दाखविले जात आहेत. विकासाची गंगा कुठे गेली, असा प्रश्न जनसामान्यांमध्ये उपस्थित केला जात आहे. आता त्यांना माफ करायचे नाही. या निवडणुकीत चंडिकेचे रुप धारण करून त्यांना जागा दाखवण्याची वेळ आली आहे, असे आवाहन शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे यांनी केले.**

# विरोधकांना जागा दाखवा

**ॲड. मानसी म्हात्रे यांचे आवाहन**

- **रोह्यात शेकापचा महिला संवाद मेळावा उत्साहात**
- **चित्रलेखा पाटील यांच्या कार्यप्रणालीवर महिलांचा विश्वास**
- **निवडणुकीत चंडीकेचे रुप धारण करा; मानसी म्हात्रे यांचे आवाहन**

रायगड जिल्हा महिला बचत गट फेडरेशन पुरस्कृत लेक शिवबाची अंतर्गत भव्य महिला मेळावा (दि.१३) सोनगाव येथील साने गुरुजी विद्या निकेतनच्या प्रांगणात आयोजित करण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, अलिबाग नगरपरिषदेच्या माजी नगरसेविका संजना कीर, शेकाप राज्य विद्यार्थी संघटना अध्यक्षा साम्या कोरडे, अंजली ठाकूर, सुषमा दिवकर, विनया चौलकर, समिरा वाघमारे, अंकिता मोहिते, मधुरा मढवी आदी मान्यवरांसह शेकाप महिला आघाडीच्या पदाधिकारी, सदस्या, महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे त्यांनी सांगितले, आजचा हा मेळावा महिलांनी एकत्रित येऊन आपल्या न्याय हक्कासाठी लढण्यासाठी घेण्यात आला आहे. आपले संघटन मजबूत करण्यासाठी तसेच राज्याच्या विधानसभेत महिलांचे विचार पोहचले पाहिजेत यासाठी या मेळाव्याच्या माध्यमातून एकत्र आलो आहोत.

एका बाजूला लाडकी बहीण योजना राबविण्याचे काम करीत असताना, दुसऱ्या बाजूला महाडमधील लोकप्रतिनिधी एका महिलेबद्दल अपशब्द बोलतात. महिलांच्या प्रतिनिधीत्वावर, पात्रतेवर अविश्वास ठेवतात. महिला दुर्बल, कमकुवत आहे, असा विचार ते करीत आहेत. ही चिंताजनक बाब आहे. महिलांनी दुर्बल असणे सोडून द्या. त्यांनी संघटीत राहून लढा देण्याची गरज आहे. चार दिवसांवर येऊन ठेपलेल्या निवडणुका समोर ठेवून बहिणींना खुश करण्यासाठी एक हजार पाचशे रुपयांची ओवाळणी देण्याचे काम केले जात आहे. हा पैसा त्यांचे घर,

•› पान २ वर

## गावे, वाड्यांच्या विकासासाठी शेकाप कटिबध्द : चित्रलेखा पाटील



शेकापचे नेते माजी आ. पंडित पाटील, सुप्रिया पाटील यांच्यासह माजी राज्यमंत्री स्व.मीनाक्षी पाटील यांनी यापूर्वी या विभागाचे नेतृत्व केले आहे. अनेक प्रश्न सोडविण्यासाठी ते कायमच कटिबध्द राहिले आहेत. गेल्या पाच वर्षामध्ये निवडून दिलेल्या आमदारांमुळे या भागात विकासाला ग्रहण लागले. अनेक पाण्याचे प्रश्न रखडले आहेत. रोजगाराचा प्रश्न आहेत, त्याची सोडवणूक करण्यास विद्यमान आमदार अपयशी ठरले आहेत. फक्त बॅनरबाजी करण्याचे काम त्यांनी केले आहे. त्यामुळे महिलांनी आपल्या न्याय हक्कासाठी एकत्र येणे गरजेचे आहे. तुमच्या डोक्यावरील हंडा उतरविण्याचा प्रश्न नक्की सोडवेन,बचत गट उभारून महिलांना

•› पान २ वर

## वे|ध|क

### सरकारच्या प्रत्येक कृतीवर संशय

**मुंबई :** महाराष्ट्र ही मोदी-शाहांच्या गुलामांची वसाहत झाली आहे, अशा पद्धतीने सरकार चालवले जात आहे. हे सरकार आता घालवावेच लागेल. काल बाबा सिद्दीकी यांची हत्या झाली. संपूर्ण देशात मुंबई असे एकमेव शहर असेल जिथे दोन पोलीस आयुक्त आहेत. आणखी पाच वाढवा, काही हरकत नाही. तुमचे जे-जे लाडके अधिकारी आहेत, त्यांना आयुक्त करा. पण कारभार सुधारा. महिला, राजकारणी, सत्ताधारी पक्षातील नेते असुरक्षित आहेत. मग सामान्य जनतेचे काय होणार? ना.नाना पटोले यांचा फोन टॅप करण्याकडे लक्ष आहे, मग सुरक्षिततेकडे का नाही? महाराष्ट्र सुरक्षित आहे का? गद्दारांच्या सुरक्षेसाठी पोलीस तैनात आहेत? सरकारच्या प्रत्येक कृतीबद्दल संशय व्यक्त केला जात आहे. हे गंभीर आहे, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली.येत्या दोन-तीन दिवसांत विधानसभा निवडणुकांची आचारसंहिता जाहीर होण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीमधील तीनही घटक पक्षांच्या प्रमुख नेत्यांनी रविवारी (दि.१३) संयुक्त पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका जाहीर केली. तसेच महायुतीच्या धोरणावर जोरदार टीका केली.

# आमदारांनी रोहेकरांना नाकारलं?

**बॅनरवरुन रोहा तालुक्याचं नाव गायब, फक्त अलिबाग-मुरुडचं करणार नेतृत्व**

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**
विधानसभा निवडणूक तोंडावर आली असल्याने गेले पाच वर्षे निद्रावस्थेत असलेल्या आमदारांची झोप उडाली आहे. मतदारांना खूष करण्यासाठीपुन्हाएकदाआश्वासनांचा पाऊस पाडण्याचा प्रयत्न करताना ते दिसत आहेत. अशातच शेकापच्या मेळाव्यात होणारी गर्दी पाहून त्यांच्या पायाखालची वाळूच सरकली आहे. त्यामुळे त्यांनीही मेळावे

•› पान २ वर




**रोहेकरांची भूमिका महत्वाची**

**शिंदे गटाच्या मेळाव्यात आमदारांच्या काही बॅनरवरुन रोहा तालुक्याचं नाव वगळण्यात आलं होतं. निर्णायक मतदार असतानाही आमदारांनी तालुक्याला नाकारल्यानंतर रोहा मतदारसंघातील मतदार नेमकी काय भूमिका घेणार, याकडे साऱ्यांचे लक्ष लागून राहिले आहे.**

> **अलिबाग विधानसभा मतदार संघात रोहा तालुक्यातील काही भाग समाविष्ट आहे. अलिबाग रोहा मार्गावरील रस्त्याचे काम स्वखर्चाने करीन असे आमदार दळवी यांनी आश्वासन दिले होते. मात्र आजही हा रस्ता खड्ड्यात असलेले चित्र आहे. विधानसभा मतदारसंघातील रोह्याला आमदार डावलत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत त्यांना रोहेकरांच्या रोषाचा फटका नक्कीच बसेल.**
> **– हेमंत ठाकूर**

# बाबा सिद्दीकींचा गोळीबारात मृत्यू

**। मुंबई । प्रतिनिधी ।**
राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते बाबा सिद्दीकी यांच्यावर शनिवारी (दि.१२) तीन अज्ञातांनी गोळीबार केला. लोकसभा निवडणुकीच्या आधी बाबा सिद्दीकींनी काँग्रेसची साथ सोडली होती. बॉलिवूडमध्ये बाबा सिद्दीकी प्रसिद्ध होते. शनिवारी रात्री साडेआठच्या सुमारास वांद्रे येथील खेरवाडी जंक्शनजवळ बाबा सिद्दीकींवर तीन अज्ञातांनी गोळीबार केला. गोळीबारात बाबा सिद्दीकी जखमी झाले. लिलावती रुग्णालयात बाबा सिद्दीकींना दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.



बाबा सिद्दीकी हे वांद्रे येथील खेरवाडी सिग्नलजवळ झिशान सिद्दीकी यांच्या ऑफिसमध्ये चालले होते. त्यावेळी तीन अज्ञात व्यक्तींनी बाबा सिद्दीकींवर

•› पान २ वर

# प्रागतिक पक्षांतर्फे राज्यव्यापी परिषद



**। मुंबई । प्रतिनिधी ।**
मुंबईत भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यालयात रविवारी (दि.१३) महाराष्ट्रातील प्रागतिक पक्षाची संयुक्त बैठक संपन्न झाली. यामध्ये बुधवारी (दि.१६) नाशिक येथे भव्य राज्यव्यापी परिषद आयोजित करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला.

नाशिकमध्ये होणाऱ्या परिषदेत येत्या विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीने पर्यायी जनताभिमुख धोरणे जाहीर करावीत आणि प्रागतिक पक्षांसोबत जागा वाटपाबाबत सन्मानपूर्वक तडजोड करावी, अशी आग्रही मागणी करण्यात येईल. महाराष्ट्रभरातून हजारो लोक या परिषदेत सहभागी होतील. पर्यायी जनताभिमुख धोरणे स्वीकारल्यास आणि सन्मानपूर्वक तडजोड झाल्यास महाविकास आघाडी जास्त मजबूत व्हावी, यासाठी ही परिषद आयोजित करण्यात येणार आहे.

महाविकास आघाडीच्या नेतृत्वासोबत चर्चा करण्यासाठी माजी आ. जयंत पाटील, आ. अबू असीम आझमी, डॉ. अशोक ढवळे व डॉ. भालचंद्र कानगो या चार सदस्यांच्या समितीची नेमणूक करण्यात आली. या बैठकीत शेतकरी कामगार पक्षातर्फे माजी आ. जयंत पाटील, प्रा. एस. व्ही. जाधव व राजेंद्र कोरडे, समाजवादी पक्षातर्फे मेराज सिद्दीकी व राहुल गायकवाड, भारतीय कम्युनिस्ट

•› पान २ वर

## ‘शहीद झाल्यानंतर भेदभाव का?’

**नवी दिल्ली :** नाशिक आर्टिलरी सेंटरमध्ये दोन अग्निवीरांच्या बलिदानानंतर काँग्रेस नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर हल्लाबोल केला आहे. राहुल गांधी यांनी शहीद झाल्यानंतर भेदभाव कशासाठी अशी विचारणा केली आहे.

राहुल गांधी म्हणाले की, नाशिकमध्ये प्रशिक्षणादरम्यान दोन अग्निवीर गोहिल विश्वराज सिंह आणि सैफत शिट यांचे निधन ही एक वेदनादायक घटना आहे. त्यांच्या कुटुंबियांप्रती माझी तीव्र संवेदना आहे. या घटनेने पुन्हा एकदा अग्निवीर

•› पान २ वर

# आ.गोगावले विरोधात महिलांमध्ये संतापाची लाट

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**
शिवसेना शिंदे गटाचे आमदार भरत गोगावले यांनी शिवसेना (उबाठा) नेत्या स्नेहल जगताप यांच्याविरोधात आक्षेपार्ह व्यक्त केले होते. त्या विरोधात आता रायगड जिल्ह्यातील तमाम महिलांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. विविध समाजमाध्यमांवर देखील आमदार गोगावले यांचा निषेध व्यक्त करण्यात येत असून त्यांनी महिलांची माफी मागावी अशी मागणी जोर धरत आहे.

राज्यात सत्तांतर झाल्यानंतर स्नेहल जगताप यांनी शिवसेना (उबाठा) मध्ये प्रवेश करत हातात शिवबंधन बांधले होते. शिंदे गटाने उध्दव ठाकरे यांच्यासोबत गद्दारी केल्याची भावना शिवसैनिकांची झाली. त्यामुळे ठाकरेंना चांगलीच सहानभुती मिळत आहे. स्नेहल जगताप या मुळात काँग्रेसच्या त्यांच्यामागे आजही काँग्रेस ठामपणे उभी आहे. त्यांचे वडील माणिक जगताप यांनी महाड विधानसभा मतदार संघामध्ये काँग्रेस तळागाळात रुजवली आणि वाढवली होती. त्याचा फायदा स्नेहल

•› पान २ वर

> **एकिकडे महिलांना लाडक्या बहिणीचा दर्जा द्यायचा अन् दुसरीकडे त्याच लाडक्या बहिणीसाठी अपशब्द वापरायचे, हे गंभीर आहे. सत्तेच्या जोरावर सत्ताधारी आमदार महिलांबद्दल आक्षेपार्ह विधान करीत आहेत, ही लाजिरवाणी बाब आहे. अशा सत्ताधाऱ्यांमुळेच आज महिला असुरक्षित आहेत. महिलांबद्दल अपशब्द वापरणाऱ्यांचा जाहिर निषेध करते.**
> **– चित्रलेखा पाटील, शेकाप**

**सिडको महामंडळ बांधणार धरण; प्रकल्पग्रस्तांचे करणार पुनर्वसन**

# कोंढाणे धरणासाठी 2500 कोटीचे अंदाजपत्रक

**संतोष पेरणे**
**। नेरळ ।**
कर्जत तालुक्यातील उल्हास नदीवर बांधण्यात येणाऱ्या कोंढाणे धरणाच्या कामासाठी पहिल्या टप्प्यात १४०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. कोंढाणे धरण सिडको महामंडळ बांधणार असून हे धरण बांधण्यासाठी २५०० कोटी खर्च येणार आहे. कर्जत तालुक्यातील कोंढाणे येथून पाणी उचलून नवी मुंबईत नेले जाणार आहे. या प्रकल्पाचे काम लवकरच सुरु होणार आहे. या प्रकल्पामुळे या भागातील २५० हेक्टर जमीन ओलिताखाली येणार असून प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन केले जाणार आहे.

कर्जत तालुक्यातील उल्हास नदीवर कोंढाणे येथे मध्यम धरण प्रकल्प महाराष्ट्र शासनाने २०११ मध्ये मंजूर केला होता. मात्र झपाट्याने विकसित होणाऱ्या सिडकोच्या नैना क्षेत्रातील रहिवाशांची तहान भागविण्यासाठी नवी मुंबईपासून ३५ किलोमीटर लांब असलेल्या कर्जत तालुक्यातील कोंढाणे धरण आपल्याला मिळावे, यासाठी २०१७ मध्ये प्रयत्न सुरु झाले. त्याआधी २०१२ पासून कोंढाणे धरणाचे काम कथित सिंचन घोटाळ्यामुळे बंद ठेवण्यात आले होते.




नवी मुंबईमधील नैना प्रकल्पासाठी पाणी आरक्षित करण्यासाठी कोंढाणे धरण प्रकल्प सिडको महामंडळाच्या मागणीनुसार राज्य शासनाने तीन वर्षांपूर्वी मान्य केले आणि हे धरण बांधण्यास सिडको महामंडळास परवानगी दिली. सिडको नैना क्षेत्रासाठी लागणाऱ्या संभाव्य पाण्यावर हक्क कायम ठेवणार आहे. हे धरण लवकरात लवकर व्हावे, यासाठी सिडको महामंडळाकडून धरणासाठी २९१ हेक्टर वन जमीन आणि ९७ हेक्टर खासगी जमिनीचे अधिग्रहण करावे लागणार आहे. या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या मुंडेवाडी गावातील ११८ कुटुंबांच्या पुनर्वसन केले जाणार आहे.

१७ वर्षांपूर्वी या धरणाचा प्रस्ताव तयार केला होता. वन विभागाची २९१ हेक्टर जमिन यापूर्वी हस्तांतरित झाली आहे. तर स्थानिक शेतकऱ्यांच्या ९७ हेक्टर जमिनीचे अधिग्रहण काम सुरू आहे. धरणाच्या कालव्यांमधून आजूबाजूच्या गावांमधील २५० हेक्टर जमीन ओलिताखाली येणार असून तो परिसर हिरवागार होणार आहे. या धरणाच्या पहिल्या टप्प्यातील १४०० कोटींच्या कामाला मंजुरी मिळाली असून त्या कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पामुळे या भागाचा नियोजनबद्ध विकास व्हावा, म्हणून शासनाने २७० गावांलगतचे ४७४ किलोमीटर क्षेत्र

•› पान २ वर

# बामणगावमधील रस्ते होणार चकाचक



- **शेकाप नेते जयंत पाटील यांच्या माध्यमातून निधी उपलब्ध**
- **शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख यांच्या हस्ते भूमीपूजन**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**
अलिबाग तालुक्यातील बामणगाव गावातील सर्व अंतर्गत रस्त्यांसाठी शेकापचे नेते जयंत पाटील यांच्या माध्यमातून ५० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करण्यात आला. शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते शनिवारी विजयमादशमीच्या

•› पान २ वर

# भेसळमाफियांना रान मोकळे

## १० अन्न आणि औषध निरीक्षकांची पदे रिक्त; दोन निरीक्षकांवर निवडणुकीची जबाबदारी

**। रायगड । प्रतिनिधी ।**

सणासुदीच्या काळात मिठाई व इतर खाद्यपदार्थांना मोठ्या प्रमाणावर मागणी असते, मात्र काही विक्रेते भेसळयुक्त खाद्यपदार्थांची विक्री करून लोकांच्या जीवाशी खेळतात. अन्नपदार्थांमधील भेसळ रोखण्यासाठी राज्य सरकारचा खास विभाग कार्यरत आहे. मिठाई तयार करणाऱ्या कारखान्यांसह किरकोळ विक्री करणाऱ्या दुकानांची तपासणी करण्याची जबाबदारी या निरीक्षकांवर असते; परंतु रायगड जिल्ह्यात दोन्ही निरीक्षकांना निवडणुकीच्या कामाला लावण्यात आले आहे. त्यामुळे दिवाळीदरम्यान मिठाई व खाद्यपदार्थांमधून होणारी भेसळ कोण रोखणार, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.



१५ तालुक्यांसाठी १२ अन्न आणि औषध निरीक्षकांची पदे मंजूर आहेत. यातील फक्त दोनच पदे भरली असून उर्वरित १० पदे रिक्त आहेत. त्यामुळे दोन निरीक्षकांवर कामाचा अतिक्ति ताण पडतो आहे. दिवाळीत या निरीक्षकांच्या जबाबदारीत आणखीन वाढ होण्याची शक्यता आहे.

अवघ्या काही दिवसांवर आलेल्या दिवाळी सणात होणारी भेसळ रोखण्याबरोबरच अन्न आणि औषध निरीक्षकांना निवडणुकीच्या कामासाठी जुंपण्यात आले आहे. त्यामुळे औषधांचे नमुने घेणे, वैद्यकीय दुकानांची तपासणी, खाद्यपदार्थ तयार करणाऱ्या कंपन्यांच्या पदार्थांची तपासणी करणे अशीही कामे त्यांना करावी लागणार आहेत. त्याचबरोबर नागरिकांनी केलेल्या तक्रारींचीही शहानिशा करण्याची जबाबदारीही दोन निरीक्षकांवर आहे. निवडणुकीच्या कामात हे निरीक्षक आपल्या जबाबदारीकडे किती लक्ष देतील, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

सणासुदीच्या काळात मिठाई व इतर खाद्यपदार्थांची मोठ्या प्रमाणावर मागणी असते. रायगड जिल्ह्यात हे प्रमाण खूप जास्त आहे. काही व्यावसायिकांकडून भेसळयुक्त अन्नपदार्थ विकण्याची साखळी निर्माण करण्यात आली आहे. ही साखळी सणासुदीच्या दिवसांत अधिक सक्रिय होते. यंदाच्या दिवाळीत अशा भेसळ करणाऱ्यांसाठी रान मोकळे झाले आहे. काही लोक पैशाच्या लालसेपोटी भेसळयुक्त खाद्यपदार्थांची विक्री करतात. यंदाही दिवाळीनिमित्त भेसळयुक्त मिठाई व खाद्यपदार्थांमधील भेसळ वाढण्याची शक्यता आहे. अन्न व औषध प्रशासनाकडून सणापूर्वी छापे मारून भेसळयुक्त खाद्यपदार्थ विकणाऱ्यांवर कारवाई केली जाते, मात्र प्रशासनाची ही कारवाई अपुरी पडते, पुन्हा ही साखळी सक्रिय होत असल्याने दिसून येत आहे.

> जिल्ह्यातील भेसळ रोखण्यासाठी १२ पदे मंजूर आहेत. यातील दोनच पदे भरली असून त्यांच्यावरही निवडणूक काम काजाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. जिल्ह्यातील काही तालुके दुर्गम असल्याने तेथे जाणे-येणे जिकरीचे होते. त्यामुळे दिवाळीतील भेसळ रोखण्याच्या मोहिमेत थोडीशी बाधा येऊ शकते.
> – मारुती घोसाळवाड, सहाय्यक आयुक्त अन्न व औषध प्रशासन, पेण

## ट्रकच्या धडकेत दोघे जखमी

**नवीन पनवेल :** पुणे मुंबई एक्स्प्रेस वे वर टायर बदलत असताना ट्रकने दिलेल्या धडकेत दोघेजण जखमी झाले. लव भगत हे कोळीवाडा, कल्याण वेस्ट येथे राहत असून एकविरा देवीच्या दर्शनासाठी ते त्यांच्या मित्रांसह सुझुकी कंपनीची एर्टिगा कार घेऊन टिटवाळा येथून बाहेर पडले. एकविरा देवीचे दर्शन घेऊन परत निघाले असता पुणे मुंबई एक्स्प्रेस वे ने जात असताना किरण जाधव गाडी चालवत होता. एक्स्प्रेस वेवर जात असताना देवद गावाजवळ कारच्या ड्रायव्हर साइडच्या पाठीमागील चाक पंक्चर झाले. त्यामुळे गाडी चौथ्या लेनवर थांबवली. सुरेंद्र आग्रहरी आणि लव भगत हे दरवाजाजवळ गेले असता मालवाहतूक ट्रकने दोघांना ठोकर मारून भरधाव वेगाने न थांबता निघून गेला. यात दोघेही जखमी झाले त्यांना एमजीएम हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले.

## एपीएमसी प्रवेशद्वारावर बसली फास्टॅग प्रणाली

**नवी मुंबई :** वाशीतील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिति दररोज हजारो वाहनांची वर्दळ असते. मात्र काही गाड्या बाजार आवारात अशाच उभ्या असतात. त्यामुळे नवीन येणाऱ्या वाहनांची अडचण होते. यावर तोडगा काढण्यासाठी एपीएमसी प्रशासनाने प्रत्येक बाजारातील प्रवेशद्वारावर फास्टॅग प्रणाली सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

एपीएमसी प्रशासकीय इमारतीत नुकतीच बाजार समितीमधील अडीअडचणी सोडवण्यासाठी तसेच बाजाराच्या उत्पन्न वाढीसाठी पाचही बाजार आणि मुख्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अडीअडचणी सांगितल्या. यामध्ये बाजार समितीच्या आस्थापनावर कंत्राटी पद्धतीने कर्मचाऱ्यांचा विरोध, नवीन भरती करण्याऐवजी शासनाकडून बाजार समिती मध्ये अधिकाऱ्यांना सेवेवर आणा जेणेकरून बाजार समितीचे कामकाज सुरळीत होईल तसेच बाजारात होणारी वाहतूक कोंडी यावर चर्चा करण्यात आली.

या बैठकीत बाजारात फास्टॅग प्रणाली सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. टोलनाक्यांप्रमाणेच पाचही बाजारांच्या प्रवेशद्वारावर बॅरिकेड्स आणि फास्टॅग प्रणाली लावण्यात येणार आहे. या यंत्रणेमुळे बाजार समितीच्या उत्पन्नात वाढ होऊन वाहतूक सुरळीत होण्यास मदत होणार आहे. प्रत्येक बाजाराच्या प्रवेशद्वारावर ही फास्ट टॅग प्रणाली येत्या काही दिवसात कार्यान्वित करण्यात येणार आहे. यामुळे बाजारात विनाकारण उभ्या असलेल्या गाड्यांवर नियंत्रण मिळवता येईल आणि शेतमाल खाली करून देखील बाजारात उभे असलेल्या गाड्यांना दंड आकारता येईल, त्यामुळे वाहतूक कोंडीची ही समस्या मार्गी लागेल.

# माथेरानमध्ये सजवलेल्या घोड्यांची मिरवणूक

### अश्वपाल संघटनेकडून दसरा सण साजरा

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान येथील ५०० कुटुंब ही घोड्यांचा व्यवसाय करून आपल्या कुटुंबाची उपजीविका करतात.त्यामुळे दसरा सणाचे निमित्ताने अश्वपाल संघटना यांच्या माध्यमातून सजवलेल्या घोड्यांची मिरवणूक काढून दसरा साजरा करतात.दरम्यान,यावर्षी पर्यटकांची गैरसोय होऊ नये म्हणून दसऱ्याचे दुसऱ्या दिवशी मिरवणुकीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.




माथेरान हे पर्यटन स्थळ वाहनमुक्त असल्याने या पर्यटन स्थळी येणारे पर्यटक यांच्यासाठी घोडे हे वाहतुकीचे साधन आहे. माथेरान शहरात घोड्यावरून पर्यटकांना सैर करून आणणारे ४५० घोडे असून साधारण ५०० कुटुंब या व्यवसायावर अवलंबून आहेत. त्यामुळे घोडा हा माथेरानमधील अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन आहे. मिळवून देणाऱ्या घोड्यांना दसरा या सणाचे दिवशी सुट्टी दिली जाते.माथेरान मधील स्थानिक अश्वपाल संघटना आणि मुलवासी अश्वपाल संघटना यांच्याकडून दसऱ्याच्या दिवशी सजवलेल्या घोड्यांची मिरवणूक काढली जाते. दसऱ्याला शनिवार असल्याने माथेरानमध्ये पर्यटनासाठी आलेले पर्यटक यांची गैरसोय होऊ नये साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला.त्यानुसार माथेरानमधील प्रत्येक प्रवासी वाहतूक करणारा घोडा सजला होता.

सजवलेल्या घोड्याला तिलक लावून तबेल्यातून बाहेर काढण्यात आल्यानंतर रिगल नाका येथे एकत्र जमीन सर्व घोड्यांची ढोलताशे यांच्या सोबत मिरवणूक निघाली. रिगल नाका येथून ही मिरवणूक आली. तेथे घोड्यांची विविध प्रकारची प्रात्यक्षिके केलीत्यावेळी अश्वपाल संघटनेच्या अध्यक्ष आशा कदम, शैलेश शिंदे, विकास रांजाणे, किरण जाधव, पंकज घावरे, इस्माईल शेख, अरबाज खान, अंकुश आखाडे सनी घावरे, माथेरान पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सोनोने, रेखा चौधरी आदी उपस्थित होते.

## हातातील चावीने डोक्यात मारहाण

**नवीन पनवेल :** व्हाट्सप ग्रुपवर शिवीगाळ का केली याची विचारणा केली असता हातातील चावीने मारहाण केल्याप्रकरणी केतन पाटील विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. धृप राजेश पाटील हा घोटगाव येथे राहत असून १० ऑक्टोबर रोजी केतन पाटील याने चार ते पाच लोकांचा ग्रुप मध्ये वडील राजेश पाटील व काका बाळकृष्ण पाटील यांना शिवीगाळ केली. यावेळी वडील आणि काकांना शिवीगाळ का केली असे मोबाईलवर विचारले असता त्याने धृपला देखील शिवीगाळ केली. दोघे चुलत भाऊ असल्याने धृप त्याच्या घरी गेला आणि केतन याने त्याला दमदाटी करून मारहाण केली. झटापटीमध्ये केतन पाटील याने हातातील चावीने डोक्यात मारल्याने धृपच्या डोक्यात रक्त येऊ लागले.

# शेकाप नेते जयंत पाटील यांची महाड कृषी उत्पन्न बाजार समितीला भेट

**। महाड । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष तथा माजी विधान परिषद आमदार जयंत पाटील यांनी नुकतीच महाड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नवीन प्रशासकीय कार्यालयाला सदिच्छा भेट देऊन समितीच्या संचालक मंडळ व कर्मचारी वर्गाला शुभेच्छा दिल्या.



आपल्या पूर्वनियोजित आरडीसी बँकेच्या कामासाठी महाड तालुक्यामध्ये आले असताना त्यांनी अगत्यपूर्वक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यालयामध्ये भेट देऊन समितीकडून सुरू असलेल्या कामांची माहिती घेतली. तसेच समितीच्या भवितव्यासाठी आपण बांधील असल्याचे स्पष्ट करतानाच सर्व कार्यासाठी सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

याप्रसंगी जयंत पाटील यांचे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती श्रीधर सपकाळ, उपसभापती वैभव चांदे, आरडीसीसी बँकेचे संचालक हनुमंत जगताप व राजू मोरे यांनी स्वागत केले. यावेळी आरडीसीसी बँकेचे उपाध्यक्ष सुरेश खैरे, अस्लम राऊत, बाजार समितीच्या वतीने संतोष गायकवाड व कर्मचारी वर्ग हे देखील उपस्थित होते.

महाड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नवीन वास्तूची निर्मिती झाल्यानंतर आरडीसीसी बँकेचे अध्यक्ष जयंत पाटील यांची ही सदिच्छा भेट असल्याने महाडमधील सहकार क्षेत्रात कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना मोठे पाठबळ मिळेल, असा विश्वास बाजार समितीचे सभापती श्रीधर सपकाळ यांनी व्यक्त केला.

पान १ वरून

## विरोधकांना जागा दाखवा

जागा विकून दिला जात नाही, तर आपल्याकडून कराच्या रुपातून घेतलेल्या पैशातूनच दिला जात आहे.

शेतकरी कामगार पक्षाचे नेते स्व. प्रभाकर पाटील या जिल्ह्याचे दिशादर्शक होते. माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील, पंडित पाटील, यांनी येथील महिलांच्या डोक्यावरील हंडा उतरविण्याचे काम केले आहे. त्यांच्याकडून प्रेरणा घेत चित्रलेखा पाटील देखील त्यांच्या डोक्यावरील हंडा उतरविण्याचे काम करतील असा विश्वास आहे. कारण गेल्या अनेक वर्षापासून त्या विभागात काम करीत आहेत. स्वतःच्या खिशातील पैसे खर्च करून पाणी व इतर सुविधा देण्यासाठी धडपडत आहेत, असे ॲड. म्हात्रे यांनी सांगितले.

## ‘शहीद झाल्यानंतर भेदभाव का?’

योजनेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत, ज्याचे उत्तर भाजपला देता येत नाही. सरकार अपयशी ठरले असल्याची टीकाही त्यांनी केली.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधताना अग्निपथ योजना लष्करावर अन्याय असून आपल्या शूर जवानांच्या हौतात्म्याचा अपमान असल्याचे म्हटले आहे. एका सैनिकाचा जीव दुसऱ्या जवानाच्या जीवापेक्षा अधिक मौल्यवान का आहे, याचे उत्तर पंतप्रधान आणि संरक्षणमंत्र्यांनी द्यावे, असा सवाल त्यांनी केला.

भाजप सरकारची अग्निवीर योजना हटवण्यासाठी आणि देशातील तरुण आणि लष्कराचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी आजच आमच्या जय जवान आंदोलनात सामील व्हा, असे आवाहन काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी जनतेला केले.

## कोंढाणे धरणासाठी २५०० कोटींचे अंदाजपत्रक

हे नवी मुंबई विमानतळ प्रभावित क्षेत्र अर्थात नैना क्षेत्र म्हणून घोषित केले आहे. या क्षेत्रात विमानतळ, एसईझेड, कॉर्पोरेट आणि मनोरंजन या व्यावसायिक उपक्रमांबरोबर सिडको नैना नागरी क्षेत्र विकसित करीत आहे. या सर्व क्षेत्रासाठी मोठ्या प्रमाणात पाणी लागणार असल्याने या प्रकल्पाला प्राधान्य दिले आहे. त्यामुळे नैना क्षेत्रापासून ३० ते ३५ किलोमीटर लांब आणि कर्जत शहरापासून १३ किलोमीटर दूर असलेल्या कोंढाणे धरणाचा पर्याय निवडण्यात आला आहे. या धरणाच्या पाण्यावर स्थानिक परिसरातील २५० हेक्टर जमिनीवर उन्हाळ्यात शेती देखील फुलणार आहे. तर धरणाच्या पाण्यामुळे उन्हळात कोरडी असलेली उल्हास नदी बारमाही वाहणार आहे.

## प्रागतिक पक्षांतर्फे राज्यव्यापी परिषद

पक्षातर्फे डॉ. भालचंद्र कानगो, सुभाष लांडे, प्रकाश रेड्डी, राजू देसले, प्रा. राम बाहेती, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षातर्फे डॉ. अशोक ढवळे, किसन गुजर, डॉ. एस. के. रेगे, शैलेंद्र कांबळे, आणि सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षातर्फे किशोर ढमाले हजर होते.

## गावे, वाड्यांच्या विकासासाठी शेकाप कटिबध्द : चित्रलेखा पाटील

रोजगाराचे दालन खुले करून देईल, असा विश्वास शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी चित्रलेखा पाटील म्हणाल्या की, गेल्या अनेक दिवसांपासून महिला संवाद मेळावा सुरु आहे. या मेळाव्याला मोठ्या संख्येने महिला सहभागी होऊन उत्स्फुर्त प्रतिसाद देत आहे. पाटील कुटुंबियांसह शेतकरी कामगार पक्षावर असलेल्या प्रेमामुळे हा प्रतिसाद दिसून येत आहे. समाजाचा विकास महिलाच करू शकते. समाजाची खरी ताकद महिलाच आहे. महिलांचा सर्वांगिण विकास व्हावा, त्यांच्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार रुजविण्याची गरज आहे. कुटूंब चालविण्याबरोबरच समाजाचा कारभार महिला चालविण्याचे काम महिला सक्षमपणे करते. त्यामुळे कोणत्याही संकटाशी सामना करण्याची शक्ती ही महिलेमध्ये आहे. याची जाणीव या सरकारला असणे आवश्यक आहे.

बचत गटातील महिलांना सक्षम करण्यासाठी त्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी महिला बचत गटांसाठी बचत गट भवन उभारण्याचा मानस आहे. त्यांना कष्टाने १५ हजार रुपये कमविण्याची ताकद निर्माण करून दिली जाईल, अशी ग्वाही चित्रलेखा पाटील यानी दिली.

त्या पुढे म्हणाल्या, महिलांच्या सुरक्षेचा, रोजगाराचा प्रश्नदेखील गंभीर आहे. बदलापूरसह उरण येथील महिलांवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेने महिला सुरक्षेचा प्रश्न गंभीर झाला आहे. महिलांना सुरक्षितता देणे ही सरकारची जबाबदारी आहे.त्यासाठी महिलांनी लढले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिका, संघटीत व्हा व संघर्ष करा हा मुलमंत्र दिला. आजच्या हूकूमशाही व दडपशाही विरोधात लढण्यासाठी महिलांनी संघटीत होण्याची गरज आहे, असे असे चित्रलेखा पाटील यांनी सांगितले.

## बाबा सिद्दीकींचा गोळीबारात मृत्यू

गोळीबार केला आणि त्यानंतर हे तिघंही तिथून पसार झाले. हे तीन लोक कोण होते? सिद्दीकींवर कुणी गोळीबार केला? त्यामागचं कारण काय होतं? याबाबत अद्याप माहिती समोर आलेली नाही. सदरची माहिती प्रत्यक्षदर्शींनी माध्यमांशी बोलताना दिली.

यानंतर विरोधी पक्षाकडून गृहखात्याच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे.

स्थानिक पोलिसांनी हल्लेखोरांचा शोध सुरु केला आहे. बाबा सिद्दीकी माजी आमदार आणि मंत्री होते. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर त्यांनी काँग्रेस पक्ष सोडून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात प्रवेश केला होता. बाबा सिद्दीकी हे त्यांच्या इफ्तार पार्टीसाठी ओळखले जात असत. त्या पार्ट्यांमध्ये बॉलिवूड स्टार्स जात असत.

## आमदारांनी रोहेकरांना नाकारलं?

घेण्याचा निर्धार केला. मात्र या मेळाव्यात रोहा तालुक्याला डावललं असल्याचं दिसून आलं. अलिबाग-रोहा मार्गावर रविवारी (दि.१३) आयोजित करण्यात आलेल्या शिंदे गटाच्या मेळाव्यासाठी त्यांनी चांगलीच बॅनरबाजी केली. मात्र त्यात ज्यांच्या अंगी कतृत्व, तोच करेल अलिबाग-मुरुडचं नेतृत्व असं लिहिण्यात आलं आहे. यावरुन त्यांना रोहा मतदारसंघातील मतदारांची गरज नसल्याची चर्चा परिसरात रंगली होती. गेल्या पाच वर्षात त्यांनी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता केली नसल्याने मतदारांमध्ये त्यांच्याबद्दल कमालीची नाराजी आहे. सर्व मुद्दे संपल्यामुळे त्यांनी आता युवकांना केंद्रबिंदू केले आहे. अलिबाग-मुरुडमधील जनतेच्या जीवावर ते निवडून येणार, असा फाजील आत्मविश्वास स्थानिक आमदारांना आहे. रोहा तालुक्याकडे त्यांनी कायमच दुर्लक्ष केले आहे. रोहा तालुक्यातील काही भाग हा अलिबाग-रोहा-मुरुड मतदारसंघात आहे. रोह्यात जवळपास हजारो मतदार असून त्यांच्यात आमदार निवडून आणण्याची ताकद आहे. मात्र त्यांच्या मतदारांची आमदारांना गरज नसल्याचं त्यांनी झळकविलेल्या बॅनरवरुन दिसत आहे. निर्णय मतदार संघातील रोहा एक एक भाग आहे तरीदेखील विद्यमान आमदार रोहामधील गावांच्या विकासाबाबत दुर्लक्षित राहिले आहेत. माजी आ. पंडित पाटील यांनी २६ गाव योजना आणून पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला होता. परंतु दळवी आमदार झाल्यापासून ही योजना ठप्प झाली आहे.

**हा भाग ते जाणून बुजून दुर्लक्षित ठेवत असल्याची प्रतिक्रिया उमटत आहे. बॅनरमधून रोहाचं नाव डावलत असाल तर आगामी निवडणुकीत त्याचे परिणाम त्यांना पाहावयास मिळतील.**

**- संतोष दिवकर**

## बामणगावमधील रस्ते होणार चकाचक

दिवशी (दि.१२) या रस्त्याच्या कामाचा भूमीपूजन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. त्यामुळे बामणगाव गावांतील अंतर्गत रस्ते चकाचक होणार आहेत.

यावेळी शेकाप अलिबाग तालुका चिटणीस अनिल पाटील, सामाजिक कार्यकर्ते अमित पाटील, बामणगावचे माजी सरपंच रविंद्र भगत, माजी उपसरपंच नरेंद्र उळे, माजी उपसरपंच संजय ठाकूर, विद्यमान सदस्य सतिश भगत, सदस्या काविरी मानकर, अनंत थळे, निकिता राऊत, सामाजिक कार्यकर्ते जगदीश भगत, गजानन पाटील आदी मान्यवरांसह शेकापचे आजी माजी पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला व ग्रामस्थ उपस्थित होते.

बामणगाव गावांतील अनेक रस्ते खराब झाले होते. सामाजिक कार्यकर्ते अमित (राम) थळे यांनी ही बाब शेकापचे नेते जयंत पाटील यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यांच्या मागणीनुसार जयंत पाटील यांनी बामणगावमधील रस्त्यांच्या कामांसाठी निधी उपलब्ध करून दिला. गावातील सर्व रस्ते डांबरीकरण होणार आहेत. त्यामुळे गावातील विकासाला गती मिळणार असल्याचा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

## आ.गोगावले विरोधात महिलांमध्ये संतापाची लाट

जगताप यांनाच होणार आहे. त्यामुळे भरत गोगावले यांच्यासमोर कडवे आव्हान उभे राहिल्याने आमदार गोगावले यांच्या पायाखालची वाळू सरकु लागली आहे. स्नेहल यांना जनतेचा चांगलाच पाठींबा मिळत आहे. त्यामुळे आमदार गोगावले चक्रावुन गेले आहेत. त्यातूनच त्यांच्याकडून अशी अशोभनीय भाषा वापरली जात असल्याचा आरोप महिला वर्गातून केला जात आहे.

एका कार्यक्रमात त्यांनी स्नेहल यांना उद्देशून आक्षेपार्ह विधान केल्याने तमाम महिला वर्गामध्ये प्रचंड नाराजीचा सूर आहे. सरकार हे लाडक्या बहिण्यांच्या सुरक्षेसाठी त्यांच्या विकासासाठी कटिबध्द आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सातत्याने सांगतात. मात्र त्यांच्याच पक्षातील आमदार, पदाधिकारी हे महिलांवर अतिशय खालच्या पातळीवर जाऊन टीका करतात. त्यामुळे महायुतीचे सरकार हे महिला विरोधी असल्याचे आता जनतेला पक्के कळले आहे. आमदार गोगावले यांनी केलेल्या वक्तव्याचा जिल्ह्यातील महिलांकडून तिव्र शब्दात निषेध व्यक्त करण्यात येत आहे.

# महाड येथे आरक्षण बचाव मोर्चा

**। महाड । वार्ताहर ।**

अनुसूचित जाती- जमातींना महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्य घटनेतून जातीच्या आधारावर आरक्षण दिले आहे. या देशात जो पर्यंत जाती व्यवस्था आहे तो पर्यंत अनुसूचित जाती-जमातीच्या आरक्षणाला आर्थिक निकष क्रिमिलेयर लावू नये, यासोबतच अन्य मागण्यांसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींच्या वतीने शिवाजी चौक महाड ते प्रांताधिकारी कार्यालय महाड येथे निषेध मोर्चा काढण्यात आला. यासंबंधीचे निवेदन उपविभागीय अधिकारी तथा प्रांताधिकारी महाड यांना देण्यात आले.

अनुसूचित जातींची स्वतंत्र यादी तयार करण्याचा मूळ आधार म्हणजे हिंदू समाजात प्रचलित असलेली अस्पृश्यता आहे आणि ते सामाजिक आहे. शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास जातीच्या संबंधाने नाही. अनुच्छेद ३४१ अनुसूचित जातीमध्ये क्रिमिलेयरद्वारे स्वतंत्र वर्गीकरण करण्यास परवानगी देत नाही, जे जातीची अनुसूचित जाती म्हणून गणना करते. अनुसूचित जाती एक समान गट प्रतिबिंबित करतात आणि त्यांच्यात विभागले जाऊ शकत नाहीत. समाजात समानता आणण्यासाठी सकारात्मक उपाय योजना केल्या जाऊ शकतात. परंतु कायदेशीर आणि घटनात्मक तरतुदींच्या विरोधात नसावेत अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

यासोबतच अनुसुचित जाती-जमातींच्या उपवर्गीकरणासाठी संसदेमध्ये कायदा करावा. खासगी क्षेत्रात आरक्षण लागू करावे या मागण्या देखील निवेदनातून करण्यात आल्या. यावेळी बौद्धजन पंचायत समिति अध्यक्ष अशोक जाधव, देविदास पवार,संजय गमरे, मा. पोलीस उप निरीक्षक गुणाजी साळवी, वंचित बहुजन आघाडी तालुका अध्यक्ष अनिल जाधव आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## ज्येष्ठ नागरिकाला ४ लाखांचा गंडा

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

गुगलच्या माध्यमातून बँकेचा हेल्पलाईन नंबर शोधण्याच्या प्रयत्नात असलेल्या ज्येष्ठाला सायबर चोरट्याने बँकेचा कर्मचारी असल्याचे भासवून, तसेच त्यांना मदत करण्याचा बहाणा करत त्यांच्या बँक खात्यातून ४.५४ लाख रुपये दुसऱ्या खात्यात वळते करुन घेतल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

पनवेल शहर पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात सायबर चोरट्याविरोधात फसवणुकीसह आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल केला आहे. सदर प्रकरणात फसवणूक झालेले अशोक सक्सेना पनवेलमध्ये कुटुंबासह राहण्यास आहेत. त्यांच्या खात्यातून ४.५४ लाख रुपयांची रक्कम दुसऱ्या खात्यात वळती झाल्याचे सांगण्यात आले. एफडीमधील रक्कम बँकेतच असल्याचे बँकेकडून सांगण्यात आले. त्यानंतर सक्सेना यांनी नवी मुंबई सायबर पोलिसांकडे ऑनलाईन तक्रार केली.

# कर्जतच्या नाकर्त्या आमदाराने काय केलं ?

## सुधाकर घारेंचा आ. थोरवेंना खोचक सवाल

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

**पूर्वी कर्जत, खालापूर हे आनंदात सुफलाम होते. परंतु, या मागच्या पाच वर्षामध्ये कर्जत, खालापूरमध्ये अन्याय, अत्याचार सुरु आहेत. दादागिरी वाढली आहे. हुकुमशाही पद्धतीने प्रशासनावर दबावशाही सुरु आहे. हे सारे गेल्या पाच वर्षात नाकर्त्या आमदाराने दाखवले असून हे सर्वांना माहिती आहे, अशी घणाघाती टीका सुधाकर घारे यांनी आ. थोरवे यांच्यावर केली.**



कर्जतमधील पोलीस ग्राउंड येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने रावण दहन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अशोक भोपतराव, रायगड जिल्हा उपाध्यक्ष एकनाथ धुळे, कर्जत तालुका अध्यक्ष भगवान चंचे, खालापूर तालुका अध्यक्ष संतोष बैलमारे, युवा जिल्हाध्यक्ष अंकित साखरे, कर्जत तालुका युवक अध्यक्ष स्वप्नील पालकर, कर्जत तालुका महिला अध्यक्षा रंजना धुळे तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते तसेच कर्जतमधील अनेक नागरिक उपस्थित होते.

यापुढे घारे यांनी सांगितले कि, कर्जत शहरात फक्त नावाला आतील रस्ते झाले आहेत. वीज व्यवस्थेकडे दुर्लक्ष केले आहे. दिवसातून पाचदा लाईट जाते. कर्जत शहरामध्ये ड्रेनेजची दुरवस्था आहे. कर्जतमध्ये जाईल तिकडे दुर्गंधी आहे. नेरळमध्ये डेंग्यूने थैमान घातले आहे. यासाठी आमदारांनी काय केले? असा खोचक सवाल सुधाकर घारे यांनी आमदार महेंद्र थोरवे यांना विचारला आहे. यावेळी आपल्या निवडणूक चिन्हाविषयी बोलतांना ते म्हणाले की, आपल्या सर्वांसमोर एक मोठा प्रश्न उभा आहे की, सुधाकर भाऊ निवडणूक कसे लढवणार? मी सांगणार आहे, माझी जनता सांगेल, माझा प्रत्येक कार्यकर्ता सांगेल, या माध्यमातूनच आपण निवडणूक लढवणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या मनातला निर्णय

या कार्यक्रमात सुधाकर घारे यांनी मिश्कील अंदाजात निवडणूकी विषयी भाष्य केले आहे. यावेळी ते म्हणाले की, ग्राउंडवर एन्ट्री केल्यावर माझ्यासमोर दोन तुतारी वाजवणारे उभे राहिले. मी स्टेजवर आलो तर इथे मशाल पेटलेली दिसली. अशी मिश्कील टिप्पणी करत घारे यांनी आपल्याला निवडणूक लढण्यासाठी विविध पर्याय उपलब्ध असल्याचे संकेत दिले. तसेच, नेमका निर्णय तरी काय घ्यायचा, कारण माझ्या छातीवर घड्याळ, एन्ट्रीला तुतारी आणि स्टेजवर मशाल होती. पण आपल्या सर्वांना घाबरण्याचे काही कारण नाही. कारण आपले सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते माझ्यासोबत आहेत आणि तुमच्या मनात असेल तोच निर्णय आपण घेऊ, असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

# आदिवासींना महसुली सातबारा मिळावा


## अरुण शिवकर यांची मागणी

**। गडब । वार्ताहर ।**

पेण तालुक्यातील पाबळ खोऱ्यातील पाबळ, वरप, जिरणे, महालमेरा डोंगर तसेच कुहिरे-शिहु या भागातील आदिवासींना वन हक्क मान्यता कायद्यांतर्गत ४७१ दावेदार आदिवासींना प्रमाणपत्र व वनदस्तऐवज मिळालेले आहेत. या दोन्ही प्रमाणपत्रावर आधारित महसुली सातबारा मिळावा म्हणून मागणी आहे. याबाबत पाबळ खोऱ्यातील आदिवासींकडून गेली दोन ते तीन वर्षे मागणी होत आहे. होणाऱ्या या दिरंगाईमुळे आदिवासींमध्ये असंतोष पसरला असून यावर तात्काळ कार्यवाही करावी, अशी मागणी साकव संस्थेचे सचिव अरुण शिवकर यांनी केली आहे.



अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी वन हक्काच्या मान्यतेने साकव संस्थेने पाबळ खोऱ्यातील एकूण दहा गावांचे सामूहिक हक्क दावे केले होते. हे दावे व दळी जमिनीचे पट्टे तत्कालीन राज्यपाल महोदय सी विद्यासागर राव यांनी मंजूर केले आहेत. या दहा गावांचे रायगड जिल्हा कन्वर्जन समितीमध्ये संवर्धन संरक्षण व प्राप्त जमिनीच्या विकासाचे आराखडे देऊनही यावर अपेक्षित कार्यवाही होत नसल्याची खंत अरुण शिवकर यांनी व्यक्त केली आहे.



# घरावर वीज पडून नुकसान

**। कोलाड । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील कोलाड परिसरात शनिवारी (दि.१२) तुफान पावसाची बॅटिंग पहायला मिळाली. तसेच, गोवे गावातील सात ते आठ घरांवर वीज पडून विद्युत उपकरणे जळून मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने कोणतीही जिवीत हानी झाली नसल्याने मोठा अनर्थ टळलेला आहे.

कोलाड परिसरात शनिवारी संध्याकाळी ४ वाजण्याच्या सुमारास वीज, वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडला. यावेळी या परिसरातील गोवे गावातील विजय जवके, विश्वास निकम, मारुती निकम, गणेश दहिंबेकर, यशवंत सुतार, दिलीप आंबेकर, अविनाश आंबेकर, कमलाकर सुर्वे यांच्या घरांवर वीज पडली. यामुळे त्यांच्या घरातील विद्युत उपकरणे, विद्युत बोर्ड व वायरींग जळल्याने नागरिकांचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच, या वीजेमुळे विजय जवके यांच्या सौचालयातील पत्रे तुटून खाली पडले आहेत.

# ऐतिहासिक पॅनोरमा पॉईंटकडे दुर्लक्ष

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान या गिरिस्थानावरील सर्वात सुंदर प्रेक्षणीय स्थळ म्हणून पॅनोरमा पॉईंटची ओळख आहे. या नामशेष झालेल्या प्रेक्षणीय स्थळाकडे जाणारे रस्ते, पथदिवे आणि सुशोभीकरण करून या प्रेक्षणीय स्थळाचे पुनर्रजीवन करण्यात आले होते. मात्र, आताच्या घडीला पॅनोरमा पॉईंटकडे जाणारा रस्ता झाडाझुडपात हरवला आहे. माथेरान पालिका प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असून पर्यटकांना या पॉईंटकडे जाण्यासाठी गैरसोय होत आहे.



पॅनोरमा पॉईंट माथेरानच्या पूर्वेला असून भीमाशंकरच्या डोंगरातून वर येणाऱ्या सूर्याच्या पहिल्या किरणांचे दर्शन या पॉईंट वरून घेता येते. लालभडक सूर्याचे आगमन पाहण्यासाठी अभ्यासू पॅनोरमा पॉईंटला भेटी देत असतात. यामुळे या पॉईंटला सनराईज पॉईंट या नावाने देखील ओळखले जाते. दस्तुरी येथील पॅनोरमाकडे जाणारा बारमुख रोडवर असलेले हे प्रेक्षणीय माथेरानच्या उत्तर दिशेच्या टोकावरील एक पॉईंट असून येथून ३६० अंशाच्या कोनातून सह्याद्रीच्या डोंगर शिखराचे निसर्गरम्य नयनमनोहर दृश्य पाहता येते. याला 'पॅनोऱ्यामिक व्हूव' असे म्हणतात. यामुळे याला 'पॅनोरमा पॉईंट' असे नाव पडले आहे. दस्तुरी परिसरातील वाहनतळ येथून जवळ असलेल्या पॅनोरमा पॉईंट हा माथेरानच्या डोंगरावरील जिरेटोप समजाला जातो. दर्दी पर्यटकांसाठी हा पॉईंट महत्वाचा आहे. परंतु, या पावसाळ्यात पॅनोरमा रस्त्यावर गावत उगवले असून झाडेझुडपे देखील रस्त्यावर आली आहेत. अशा पॅनोरमा पॉईंटकडे जाणारा रस्ता माथेरान गिरिस्थान नगरपरिषदेच्या दुर्लक्षपणामुळे बंद झाला आहे.

> **माथेरान शहरातील हे महत्वाचे प्रेक्षणीय स्थळ पुन्हा एकदा बंद होण्याच्या मार्गावर असून माथेरान पालिकेच्या उदासीन कारभारामुळे आम्ही मेहनत घेऊन पॅनोरमा पॉइंटला दिलेली नवीन झळाळी लोप पावली आहे.**
> **– प्रेरणा सावंत, माजी नगराध्यक्षा, माथेरान**

# ज्येष्ठ नागरिकाला ४ लाखांचा गंडा

**। पनवेल । वार्ताहर ।**

गुगलच्या माध्यमातून बँकेचा हेल्पलाईन नंबर शोधण्याच्या प्रयत्नात असलेल्या ६७ वर्षीय रिटायर्ड व्यक्तीला सायबर चोरट्याने ४ लाख रुपयांचा गंडा घातलेला आहे.

या प्रकरणात फसवणूक झालेले अशोक सक्सेना यांना तक्का भागातील एसबीआय बँकेत काम त्यांनी गुगलवरुन एसबीआय बँकेचा हेल्पलाईन नंबर शोधण्याचा प्रयत्न केला. याचदरम्यान एका सायबर चोरट्याने सक्सेना यांना संपर्क साधून एसबीआय बँकेचा कर्मचारी असल्याचे भासवत त्यांना मदत करण्याचा बहाणा केला. यांनतर सायबर चोरट्याने सक्सेना यांना मोबाईल फोनवर युनो ॲपमध्ये तो सांगेल त्या पद्धतीने माहिती भरण्यास सांगितले. याचदरम्यान सायबर चोरट्याने सक्सेना यांच्या खात्यातून ४.५४ लाख रुपये दुसऱ्या बँकेत वळती करुन घेतले. याबाबचा मेसेज सक्सेना यांच्या मोबाईलवर आल्यानंतर त्यांनी याबाबत विचारणा केली. मात्र, त्याने थातुरमातूर उत्तर देऊन सक्सेना यांना गुंतवून ठेवले. यानंतर सायबर चोरट्याने सक्सेना यांच्या ५ लाखांची फिक्स डिपॉझिट मोडून त्यातील ३.७५ लाख रुपये काढून घेण्याचा प्रयत्न केला. याबाबतचा मेसेज सक्सेना यांना आल्यानंतर पुन्हा त्यांनी सायबर चोरट्याकडे विचारणा केली. याहीवेळी त्याने खोटे कारण सांगितल्यामुळे सक्सेना यांना संशय आल्यानंतर त्यांनी तत्काळ आपला फोन बंद केला. यानंतर सक्सेना यांनी नवी मुंबई सायबर पोलिसांकडे ऑनलाईन तक्रार केली आहे.



• सलगच्या सुट्ट्यांमुळे मुरुड समुद्रकिनारी पर्यटक दिसू लागले असून कडक उन्हात लाटांचा आनंद घेत आहेत. (छायाचित्र- सुधीर नाझरे)

# महाड औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची दुरवस्था

**। महाड । प्रतिनिधी ।**

राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे नाव बदलण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्याची अंमलबजावणी देखील तात्काळ करण्यात आली आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे नाव बदलले तरी त्यांचा कायापालट कधी होणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.



महाराष्ट्र शासनाने सध्या अस्तित्वात असलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या पुढे स्थानिक पातळीवरील थोर पुरुष, महापुरुष व स्वातंत्र्यसैनिक यांची नावे जोडण्याचा निर्णय घेतला असून त्याची अंमलबजावणी देखील झाली आहे. त्यानुसार महाड औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या नावात आता बदल होणार आहे. वीर मुराराबाजी देशपांडे औद्योगिक प्रशिक्षण संस्था असा नामोल्लेख आता यापुढे केला जाणार आहे.

रायगड जिल्ह्यातील नागोठणे, पनवेल, पेण, महाड व कोल्हापूर या ठिकाणी औद्योगिक प्रशिक्षण संस्था आहेत. यापैकी महाड औद्योगिक प्रशिक्षण संस्था गेली अनेक वर्षांपासून या ठिकाणी विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकास करत आहे. या ठिकाणी टेक्निकल इन्स्टिट्यूट आणि आयटीआय एकाच परिसरामध्ये कार्यरत आहेत. महाड औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला नवीन इमारत मिळून वीस वर्षे झालेली आहेत. तर, टेक्निकल इन्स्टिट्यूटची इमारत अत्यंत जुनी असून या ठिकाणी येणाऱ्या विद्यार्थ्यांना जीव मुठीत घेऊनच बसावे लागत आहे. परिसरामध्ये गवताचे साम्राज्य वाढले असून इमारतीचे छप्पर गळू लागले आहे. इमारती शेजारी असलेल्या वृक्षांचा मोठा धोका निर्माण झाला आहे. याकडे सार्वजनिक बांधकाम विभाग दुर्लक्ष करत असल्याचे बोलले जात आहे. तसेच, महाड आयटीआयला लागलेली गळती काढण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने पाऊल उचलणे गरजेचे आहे.

# सन मराठी प्रस्तुत सोहळा

**। पनवेल । वार्ताहर ।**

दिशा कल्चरल इव्हेंट्स प्रस्तुत दिशा महिला मंच व आरके ग्रुप आयोजित नवदुर्गा पुरस्कार व सन मराठी प्रस्तुत 'सोहळा सख्यांचा' कार्यक्रम खांदा कॉलनी येथील बेलेझ्झा बँक्वेट हॉल येथे मोठ्या उत्साहात पार पडला.



या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे आशिष पवार व आरके ग्रुपचे राजेंद्र कोलकर उपस्थित होते. यावेळी करुणा ढोरे, डॉ. श्वेता भालेराव, शांती झा, दिपाली पारसकर, डॉ. शिल्पा भंडारवार, गौरी पाटील, डॉ. विशालाक्षी कानगुले, आशा पाटील, वर्षा पाचभाई या नवदुर्गांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. आशिष पवार यांनी मनोरंजनाचे खेळ घेऊन हा सोहळा मोठ्या आनंदात साजरा केला. यावेळी ओरोस्माईल डेंटल क्लीनिकचे डॉ. शिल्पा भंडारवार व अमित भंडारवार यांचे विशेष सहकार्य मिळाले.

# रेवस-रेड्डी महामार्गावरील पूलाचे भूमीपुजन

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून प्रस्तावित रेवस ते रेड्डी या सागरी महामार्गावरील करंजा ते अलिबाग दोन किलोमीटर लांबीच्या पुलाचे भूमिपुजन रविवारी (दि.१२) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दुरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले. करंजा येथील द्रोणागिरी मंदिराच्या भक्त भवनात दुरदृश्य प्रणालीने भुमीपूजन कार्यक्रम संपन्न करण्यात आला. यावेळी स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या पुलाची एकूण लांबी ही १०.२०९ किलोमीटर आहे. मुंबईतील सागरी सेतू मार्गे द्रोणागिरी नोड येथून या पुलावरून थेट कोकणात प्रवास करता येणार आहे. तसेच, उरण येथून अवघ्या ३० ते ३५ मिनिटांच्या अवधीत अलिबाग हे जिल्ह्याचे ठिकाणी गाठता येणार आहे.

# ५२ वर्षीय महिलेची फसवणूक

**। पनवेल । वार्ताहर ।**

खारघरमध्ये राहणाऱ्या विवाहितेला अज्ञात सायबर चोरट्याने बँक खाते बंद करण्यात येत असल्याची भिती दाखवत, तसेच केवायसी अपडेट करण्याबाबतची लिंक पाठवून त्यांच्या बँक खात्यातून तब्बल १२.७७ लाखांची रक्कम परस्पर दुसऱ्या खात्यात वळती केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

या प्रकरणात फसवणूक झालेली ५२ वर्षीय महिलेला १ ऑक्टोबर रोजी सायबर चोरट्याने ॲक्सिस बँकेचा कर्मचारी असल्याचे भासवून त्यांना संपर्क साधला होता. तसेच, त्यांचे केवायसी अपडेट नसल्याचे सांगून केवायसी अपडेट करण्यास सांगितले.

अन्यथा त्यांना ३ हजार ५०० रुपये दंड भरावा लागेल आणि त्यांचे खाते बंद करण्यात येईल, अशी भिती दाखवली. यानंतर सायबर चोरट्याने या महिलेला केवायसी अपडेट करण्यासाठी एक लिंक पाठवली. ही लिंक उघडून महिलेने आपली संपूर्ण माहिती त्यात भरली. यानंतर सायबर चोरट्याने या माहितीचा गैरवापर करुन दुसऱ्या दिवशी सायंकाळी त्यांच्या खात्यातून १२.७७ लाख रुपये दुसऱ्या खात्यात वळते करुन घेतले. याबाबतचे मेसेज विवाहितेच्या मोबाईलवर आल्यानंतर त्यांनी खारघर पोलीस तक्रार दाखल केली आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांचे प्रतिपादन

# आरडीसीसी संस्थांना सक्षम करण्यास कटिबद्ध




**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

नुकतेच रायगड जिल्हा सहकारी बँकेने सर्व विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे संगणकीकरणारी देशातील पहिली जिल्हा सहकारी बँक म्हणून बहुमान संपादन केले आहे. नाबार्डचे अध्यक्ष के. व्ही. शाजी यांनी याबाबत बँकेचे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अभिनंदन केलेले असून याबाबत रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांनी बँकेच्या संगणकीकरणाच्या टप्प्यांबाबत सविस्तर माहिती दिली आहे.

संस्थांचे संगणकीकरण हा फक्त पहिला टप्पा असून, पुढील योजनांमध्ये बँकेच्या सर्व प्रक्रियांना डिजिटल स्वरूपात आणण्याचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. त्यांच्या मते, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही डिजिटल क्रांतीत पायाभूत बदल घडवून आणणारी अग्रगण्य बँक ठरली असल्याचे प्रतिपादन मंदार वर्तक यांनी केले आहे. तसेच, संगणकीकरणाच्या टप्प्यांचे स्वरूप देखील स्पष्ट केले आहे.

### संगणकीकरणाच्या टप्प्यांचे स्वरूप

**प्रथम टप्पा : संस्थांचे संगणकीकरण**
संस्थांचे संगणकीकरण यशस्वीपणे पूर्ण केले गेले असून, या माध्यमातून संस्थांची कार्यक्षमता वाढवली गेली आहे. या प्रक्रियेत बँकेच्या सर्व प्राथमिक कृषी पतसंस्थांना (PACS) संगणकी प्रणालीशी जोडले गेले आहे, ज्यामुळे संस्थांच्या कामकाजात गती, पारदर्शकता आणि अधिक चपळता आणली गेली आहे.

**द्वितीय टप्पा : तांत्रिक सुधारणा**
आता बँकेशी सर्व सलंग्न असणाऱ्या संस्थांना संपूर्ण तांत्रिक सुधारणा करण्याचा पुढील टप्पा सुरू आहे. यामध्ये डिजिटल व्यवहारांसाठी आणखी अत्याधुनिक प्रणाली बसवणे, कर्मचाऱ्यांना तांत्रिक प्रशिक्षण देणे आणि येथे स्मार्ट उपकरणे बसवणे यांचा समावेश आहे. बँकेचे आणि संस्थेचे सर्व व्यवहार पेपरलेस करण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल आहे.

**तृतीय टप्पा : डिजिटल प्लॅटफॉर्म आणि ग्राहक सेवा**
ग्राहक सेवा अधिक सुलभ आणि जलद करण्यासाठी डिजिटल प्लॅटफॉर्म आणण्याचे बँकेचे उद्दिष्ट आहे. मंदार वर्तक यांच्या मते, बँक आता डिजिटल बँकिंग सेवांचा अधिकाधिक वापर करत आहे. यामध्ये इंटरनेट बँकिंग, मोबाइल बँकिंग, सेवांसारख्या सुविधांचा समावेश आहे. भविष्यात, बँकेचे सर्व ग्राहक डिजिटल प्रणालीशी जोडले जातील, ज्यामुळे बँकेच्या सेवा अधिक चपळ आणि सुरक्षित होतील.

**चतुर्थ टप्पा : सुरक्षा आणि डेटा व्यवस्थापन**
संगणकीकरणासोबतच डेटा सुरक्षा हे बँकेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. यासाठी बँकेने सिक्युरिटी ऑपरेशन्स सेंटर (SOC) सुरू केले असून, बँकेच्या सर्व डिजिटल व्यवहारांचा सुरक्षेचा आढावा घेण्यासाठी तंत्रज्ञानातील नव्या प्रणालींचा वापर केला जात आहे. यामुळे बँक सायबर हल्ल्यांपासून सुरक्षित राहील. हेच पुढे संस्थेच्या बाबतीत लागू असेल.

**पाचवा टप्पा : ग्रामीण अर्थव्यवस्थेला पाठिंबा**
बँकेचे अंतिम उद्दिष्ट म्हणजे ग्रामीण भागातील आर्थिक विकासाला गती देणे. मंदार वर्तक यांनी स्पष्ट केले की, संस्थांचे संगणकीकरण झाल्यामुळे बँकेच्या सेवांचा थेट फायदा ग्रामीण भागातील शेतकरी आणि ग्राहकांना मिळेल. डिजिटल बँकिंगच्या माध्यमातून कर्ज देणे, ठेवी व्यवस्थापन आणि आर्थिक व्यवहार अधिक सुलभ होतील.

**कर्मचाऱ्यांचे तांत्रिक कौशल्य**
संगणकीकरणाच्या प्रक्रियेत यश मिळवण्यासाठी बँकेतील आणि या सहकारी संस्थेतील प्रत्येक कर्मचाऱ्याला तांत्रिक ज्ञान असणे आवश्यक आहे. मंदार वर्तक यांनी कर्मचाऱ्यांसाठी विशेष तांत्रिक प्रशिक्षण देण्याची योजना जाहीर केली आहे. यामुळे बँकेचे कर्मचारी अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ग्राहक सेवा देऊ शकतील.

**सहकारी संस्थांची आर्थिक मदत**
संगणकीकरणाचे परिणाम ग्रामीण संस्थांना मिळावेत यासाठी सहकारी संस्थांना आर्थिक आणि तांत्रिक सहाय्य देण्याची बँकेची योजना आहे. बँकेकडून सर्व सहकारी संस्थांना डिजिटल सेवांचा लाभ मिळावा यासाठी कर्जपुरवठा आणि अनुदाने दिली जातील.

**सतत अपग्रेड आणि नवकल्पना**
मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांनी संगणकीकरणाचा प्रवास निरंतर राहणार असल्याचे नमूद केले. बँक तंत्रज्ञानातील नवीन उपक्रमांचा अवलंब करून भविष्यातील आव्हानांना तोंड देण्यासाठी तयार आहे. संगणकीकरण ही एक सुरूवात आहे आणि बँकेचा विकास तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने होतच राहील. मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांच्या नेतृत्वाखाली रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक देशातील सहकारी क्षेत्रात डिजिटल क्रांतीचे नवे आयाम उभे करत आहे. याकरिता बँकेचे अध्यक्ष जयंत पाटील आणि सर्व संचालक यांनी ठरवून दिलेल्या धोरणप्रमाणे हा प्रवास सुरु असून यामध्ये सर्व अधिकारी चांगली मेहनत घेत आहेत, असेही त्यांनी आवर्जून सांगितले.

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

# आपटबारांची पाने

सोने लुटूनि सायंकाळी मोरू परतुनि आला, अशी एक जुनी कविता आहे. दसऱ्याच्या सणाचे हे वर्णन आहे. यातील सोने म्हणजे आपट्याची पाने होत. आपट्याच्या झाडाची पाने एकमेकांना देण्याची आणि तेच सोने मानून घेण्याची पूर्वापार पध्दत आहे. मात्र महाराष्ट्रात अलिकडे दसऱ्याला आपट्याच्या पानांच्या जोडीने आपटबारांची देवाणघेवाणही सुरू झाली आहे. पूर्वी शिवसेनेचा एकच दसरा मेळावा मुंबईत होत असे. विचारांचे सोने लुटायला वाजतगाजत या अशी त्याची जाहिरात केली जाई. आधी बाळासाहेब किंवा नंतर उद्धव यांच्या भाषणातून सोन्यासारखे विचार मिळत होते काय हा प्रश्नच आहे. पण एक खरे की, तेव्हा हा एकच मेळावा असे व त्याची चर्चा होई. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा एक मेळावा नागपुरात होई. पूर्वी भाजप सत्तेत नसल्याने त्याला महत्व नव्हते. आता भाजप सत्तेत आहे. त्यामुळे त्याची प्रसिध्दी थोडी वाढली आहे. पण मोदींपेक्षा अन्य कोणाला किंमत मिळता कामा नये असा दंडक असल्याने नागपूर मेळाव्याला अति महत्व नाही. याच दरम्यान तिकडे बीड जिल्ह्यात मुंडे मंडळींच्या दसरा मेळाव्याचे महत्व वाढले आहे. यंदा मनोज जरांगे यांचाही मेळावा झाला. या मेळाव्याला प्रचंड गर्दी होती. पण जरांगे यांनी या गर्दीला अपेक्षित असलेली कोणतीच घोषणा केली नाही. मराठा आरक्षण देण्यासाठी सरकारला त्यांनी आचारसंहितेपर्यंत वेळ दिला. ते न झाल्यास आपण शिंदे-फडणवीसांच्या सरकारला सुरुंग लावणार आहोत हे त्यांनी सूचित केले. तिकडे पंकजा यांनी आपल्या कोयत्यांना धार लावून ठेवा असा इशारा दिला. त्यांच्या समर्थकांमध्ये उसतोड कामगारांची संख्या मोठी आहे. त्यांच्या दिशेने केलेले हे आवाहन होते. लोकसभेपेक्षाही यावेळी मराठा विरुध्द ओबीसी संघर्ष अधिक तीव्र होईल याची ही लक्षणे आहेत. मात्र इतक्या महिन्यांनंतरही जरांगे यांच्यामागे जी विराट गर्दी आहे ती पाहून महायुतीचे धाबे दणाणले असेल यात शंका नाही.

### शिंद्यांची रस्त्यावरची भाषा

सर्वांना खरी उत्सुकता होती ती उद्धव ठाकरे विरुध्द एकनाथ शिंदे यांच्या सामन्याची. जमलेली गर्दी, तिच्यातला उत्साह आणि भाषण यांच्या आधारे बोलायचे झाल्यास ठाकरे यांनी शिंदे यांच्यावर सहज मात केली. शिंदे यांचे वक्तृत्व सामान्य आहे. राजकारणी डावपेचात ते हुशार आहेत. सत्ता हाती असल्याने त्यांच्या मर्यादा झाकल्या जातात. पण राजकीय विचार मांडणे वगैरे त्यांच्या आवाक्यातील बाब नाही. हिंदुत्व हाच विचार असेल तर भाजपपेक्षा आपला पक्ष वेगळा का आहे याचे उत्तर ते देऊ शकणार नाहीत. मी ठासून दोन वर्षे राज्य केलं, किंवा मला हलक्यात घेऊ नका, किंवा अमुकचा करेक्ट कार्यक्रम करतो ही त्यांची भाषा एखाद्या टपोरी शिवसैनिकासारखी आहे. पण अलिकडे सर्वच राजकारण्यांना असे गुंडासारखे बोलण्यातच गौरव वाटतो. आणि, खरे सांगायचे तर, शिंदे यांची सत्ता टिकण्यात, सर्वोच्च न्यायालयाने शिवसेना खटल्यात केलेला उशीर आणि मोदी-शाह यांच्या इडीसारख्या यंत्रणा यांचा मोठा वाटा आहे. लाडकी बहीण योजनेमुळे ते स्वतःवरच खूष आहेत. पण बदलापूर अत्याचार किंवा मालवण पुतळा प्रकरणांबाबत मात्र ते गप्प राहतात. शनिवारी हे मेळावे संपल्यानंतर रात्री माजी मंत्री व आमदार बाबा सिध्दिकी यांची मुंबईत हत्या झाली. पुण्यात दिवसाढवळ्या कोयता गँगचा धुमाकूळ चालू आहे. तरीही शिंदे आणि फडणवीस स्वतःला कार्यक्षम म्हणवून घेतात. सध्या जनतेवर जाहिरातींचा भडिमार चालू आहे. यासाठी अक्षरशः शेकडो कोटी रुपये खर्च होत असावेत. हा पैसा आज ना उद्या जनतेकडूनच वसूल होणार आहे. बिल्डर, कंत्राटदार, खासगी कंपन्या इत्यादींवर गेल्या काही दिवसात कंत्राटे व परवानग्यांची उधळण चालू आहे. तेथूनच हा पैसा येत आहे. लाडकी बहीण किंवा तत्सम योजना आणि विविध जातींसाठी महामंडळे अशी खैरात करणे म्हणजेच समर्थ राज्यकारभार अशी शिंदे यांची कल्पना आहे व तिचेच प्रत्यंतर दसरा मेळाव्यात आले.

### मुख्यमंत्रिपदाची दावेदारी

उद्धव ठाकरे यांनी नेहमीप्रमाणे शिंदे-फडणवीस सरकारवर टीका केलीच. पण आपल्या आगामी राजकारणाची दिशाही स्पष्ट केली. आघाडीमध्ये ठाकरे हेच मुख्यमंत्रिपदाचे प्रबळ दावेदार आहेत हे वेगवेगळ्या रीतीने पुन्हा अधोरेखित करण्यात आले. संजय राऊत तसे प्रत्यक्ष बोलले. शिवाय शेवटी उद्धव यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्याचा व्हिडियो दाखवून शिवसैनिकांना लढण्याची शपथ देण्यात आली. सत्तेवर आलो की महायुतीचे अनेक निर्णय रद्द करू आणि त्यांच्या भ्रष्टाचाराची चौकशी करून अधिकाऱ्यांनादेखील तुरुंगात टाकू असे आश्वासन त्यांनी दिले. जिवात जीव असेपर्यंत मोदी-शाह यांच्या ताब्यात महाराष्ट्र जाऊ देणार नाही हे ठाकरे यांचे उद्गार हेदेखील शिवसैनिकांना चेतवणारे होते. ज्या मराठी माणसाच्या मुद्द्यावर शिवसेना मुंबईत रुजली व वाढली त्याच्याकडे जाण्याचा हा प्रयत्न आहे. मुंबईत मराठींच्या खालोखाल गुजराती, जैन, उत्तर भारतीय इत्यादींचे वर्चस्व आहे. हे गट मोदींच्या भाजपच्या कह्यात गेलेले आहेत. मोदी-शाहविरोधी स्पष्ट भूमिका घेणे म्हणजे मुंबई-ठाण्यातील या गटांची मते गमावणे होय. ती जोखीम पत्करायला ठाकरे तयार आहेत, हे काल पुन्हा दिसले. अदानीला विरोध करण्याचा त्यांचा पवित्राही लक्षणीय आहे. आघाडीतील शरद पवार हे अदानीशी जवळीक साधून आहेत. अदानीचे काही प्रकल्प मार्गी लावण्यासाठी मध्यंतरी ते थेट शिंदे यांना भेटले होते. या स्थितीत ठाकरे यांनी सत्तेत आल्यास धारावीचा प्रकल्प रद्द करण्याची घोषणा करणे हे धाडसी आहे. आदित्य ठाकरे यांनी तर अदानीची सर्व कंत्राटे संमत होईपर्यंत आचारसंहित लागू होणार नाही असे सांगून थेटच हल्ला चढवला. शिवसेनेची ही भूमिका राहुल गांधी यांच्याशी मिळतीजुळती आहे. ठाकरे यांनी सर्वोच्च न्यायालयावर केलेली थेट टीका हीदेखील अशीच साहसी म्हणावी लागेल. पक्षफुटीबाबतचा संताप मतदारांमध्ये लोकसभेप्रमाणेच यावेळीही जागृत राहावा हा त्यांचा स्पष्ट प्रयत्न दिसतो. अर्थात, हे आपटबार ठीक असले तरी, जनता आपल्या मतांचे सोने कोणाच्या हवाली करणार हे पाहावे लागेल.

विचार

# बेरोजगारी घटली, आता रोजगारवाढ हवी

**_देशातील बेरोजगारीचे प्रमाण २०१७-१८ मध्ये सहा टक्के होते. ते आता ३.२ टक्क्यांवर आले आहे. शिवाय उच्च शिक्षितांमधील बेरोजगारीचे प्रमाणही खूप आहे. भारतात अधिकाधिक उत्पादक स्वरूपाच्या, गुणवत्तापूर्ण आणि चांगले वेतन देणाऱ्या रोजगारांच्या संधींची आवश्यकता आहे. भांडवलसघन, स्वयंचलित उत्पादनपद्धती आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा वाढता वापर यामुळे रोजगारनिर्मितीचे मोठे आव्हान देशासमोर आहे._**



हेमंत देसाई

महाराष्ट्रात अर्थमंत्री अजितदादा पवार यांनी जाहीर केलेल्या अर्थसंकल्पात मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना जाहीर करण्यात आली. मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण ही योजना अगोदरच जाहीर करण्यात आली असून त्यासाठी ४६ हजार कोटी रुपयांचा खर्च केला जाणार आहे. या योजनेचे ठिकठिकाणी कार्यक्रमही घेतले जात आहेत. लाडक्या बहिणींप्रमाणे लाडक्या भावांसाठी आम्ही बरेच काही करत आहोत, असा दावा महाराष्ट्रातील एकनाथ शिंदे सरकारने केला आहे. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेसाठी ५,५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. कौशल्य विकास विभाग आणि मुख्यमंत्री जनकल्याण कक्षामार्फत ही योजना राबवली जात आहे. उमेदवार हा १८ ते ३५ वयोगटातील असावा, अशी गट आहे. अशा उमेदवारांना सहा महिन्यांचा प्रशिक्षण कालावधी मिळेल. दर वर्षी कार्य प्रशिक्षणाच्या दहा लाख संधी मिळणार आहेत. बारावी उत्तीर्ण असलेल्यांसाठी सहा हजार रुपये महिना, आयटीआय आणि पदविका उत्तीर्ण असलेल्यांकरिता आठ हजार रुपये तसेच पदवीधर आणि पदव्युत्तर शिक्षण उत्तीर्ण असलेल्यांसाठी दहा हजार रुपये दिले जातील. या प्रकारे उद्योगांसाठी कुशल मनुष्यबळ तयार केले जाणार आहे. इच्छुक उमेदवार आणि आस्थापनांनी त्यासाठी सरकारकडे ऑनलाइन नोंदणी करणे अपेक्षित आहे. देशात आणि राज्यात बेरोजगारीचे प्रमाण प्रचंड असून त्यामुळे या प्रकारच्या योजनांची आवश्यकता असल्याचे कोणीही नाकारणार नाही.

चालू आर्थिक वर्षात भारताचा आर्थिक विकास दर ७.२ टक्के असेल अशी अपेक्षा आहे. आगामी काही वर्षांमध्ये अर्थव्यवस्थेची गती अशीच कायम राहील, अशी आशा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने व्यक्त केली आहे. परंतु भारतात असंख्य तरुण-तरुणींनी उत्तम शिक्षण घेतलेले असूनदेखील नोकरी मिळत नाही. मुख्य म्हणजे क्वालिटी जॉब्स किंवा काही एक गुणवत्ता आणि कौशल्य आवश्यक असणाऱ्या नोकऱ्या कमी आहेत. नुकताच पीरिऑडिक लेबर फोर्स सर्वे प्रसिद्ध झाला असून त्यामधून या प्रश्नावर प्रकाश पडला आहे. समग्र पातळीवर विचार केला असता लक्षात येते की २०१७-१८ मध्ये लेबर फोर्स पार्टिसिपेशन रेट म्हणजेच काम मिळण्याचे ४९ टक्के इतके प्रमाण २०२३-२४ पर्यंत ६० टक्क्यांवर आले आहे. ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे. परंतु एवढी वाढ होण्याचे कारण काय? तर शहरांमध्ये आणि मुख्य म्हणजे ग्रामीण भागात कामामधील महिलांच्या सहभागाचे प्रमाण २४ टक्क्यांवरून ४७ टक्क्यांवर गेले आहे. स्त्रियांचा अर्थव्यवस्थेतील सहभाग वाढत असल्यास ही स्वागताचीच बाब आहे. परंतु थोडे खोलात गेल्यास लक्षात येईल की, लाखो कुटुंबांची अवस्था इतकी बिकट असते की, घरउत्पन्नात हातभार लावण्यासाठी या स्त्रियांना घरकाम करून, शिवाय छोटी- छोटी कामेही करावी लागत आहेत. अन्यथा, त्यांची गुजराण होणे अशक्य. यापैकी बहुतेक महिला स्वयंरोजगार क्षेत्रातच आहेत.

गेल्या सहा वर्षांमध्ये स्वयंरोजगार करून पोट भरणाऱ्या महिलांचे प्रमाण ५२ टक्क्यांवरून ६७ टक्क्यांवर गेले आहे. यापैकी काही महिला या स्टॉलवर बसून विक्री करतात किंवा हातगाड्यांवर भाजी वगैरे विकतात. अशाच प्रकारे अन्य लहान-सहान कामे करतात. काही महिला आपल्याच मुलाच्या अथवा नवऱ्याच्या दुकानात हातभार लावण्यासाठी बसतात किंवा स्वतःच्या छोट्या शेतात काम करतात. त्यासाठी त्यांना कोणताही पगार मिळत नाही. दुसरे म्हणजे, मोठ्या प्रमाणातील मजूर हे अनौपचारिक क्षेत्रात काम करणारे आहेत. २०२३-२४ मध्ये प्रोप्रायटरी किंवा पार्टनरशिपमधील छोट्या, छोट्या व्यवसाय-उद्योगात काम करणाऱ्या कामगारांची संख्या एकूण संख्येच्या ७३ टक्के इतकी होती. २०१७-१८ मध्ये हे प्रमाण ६८ टक्के इतके होते. शिवाय उत्पादन क्षेत्रातील रोजगार वाढलेला नाही. तो कुंठितावस्थेत आहे. उलट, कृषी क्षेत्रातील रोजगार हळूहळू वाढत आहे.

कृषी क्षेत्रातून मिळणारे उत्पन्न कमी आणि तरीही तिथेच अधिकाधिक प्रमाणात रोजगार वाढत असल्यास, ती चिंतेची बाब मानावी लागेल. कृषीक्षेत्रात सहा वर्षांपूर्वी ४४ टक्के लोक काम करत होते. आता हे प्रमाण ४६ टक्क्यांवर गेले आहे. तर कारखानदारी किंवा उत्पादन क्षेत्रातील २०२१-२२ मधील ११.६ टक्के रोजगार २०२३-२४ मध्ये ११.४ टक्क्यांवर आला आहे. देशातील बेरोजगारीचे प्रमाण २०१७-१८ मध्ये सहा टक्के होते. ते आता ३.२ टक्क्यांवर आले आहे, ही चांगली बाब आहे. तसेच युवकांमधील बेरोजगारीचे प्रमाण याच काळात १७ टक्क्यांवरून दहा टक्क्यांवर आले आहे. तरीदेखील दहा टक्के हे प्रमाणही जास्तच आहे. शिवाय उच्च शिक्षितांमधील बेरोजगारीचे प्रमाण खूप आहे. भारतात अधिकाधिक उत्पादक स्वरूपाच्या, गुणवत्तापूर्ण आणि चांगले वेतन देणाऱ्या रोजगारांच्या संधींची आवश्यकता आहे. भांडवलसघन, स्वयंचलित उत्पादनपद्धती आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा वाढता वापर यामुळे रोजगारनिर्मितीचे मोठे आव्हान देशासमोर आहे.

'सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी' (सीएमआयई) या स्वतंत्र 'थिंक टँक'च्या आकडेवारीनुसार जून २०२४ मध्ये भारतातील बेरोजगारीचा दर ९.२ टक्के होता, मे २०२४ मधील सात टक्क्यांवरून त्यात वाढ झाली आहे. 'सीएमआयई'चा कंझ्युमर पिरॅमिड्स हाऊसहोल्ड सर्व्हे दर्शवतो की जून २०२४ मध्ये महिला बेरोजगारी १८.५ टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे, जी राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त आहे. मागील वर्षी याच कालावधीतील १५.१ टक्क्यांपेक्षा ही वाढ जास्त आहे. त्याच वेळी, पुरुष बेरोजगारी ७.८ टक्के होती. जून २०२३ मधील ७.७ टक्क्यांपेक्षा ती किंचित जास्त आहे. कामगार सहभाग दर (एलपीआर) जून २०२४ मध्ये ४१.४ टक्क्यांपर्यंत वाढला. जून २०२३ मध्ये तो ३९.९ टक्के होता. ग्रामीण बेरोजगारीचा दर मे महिन्यातील ६.३ टक्क्यांवरून जूनमध्ये ९.३ टक्के झाला. शहरी बेरोजगारीचा दर ८.६ टक्क्यांवरून ८.९ टक्क्यांवर पोहोचला आहे. 'एलपीआर'हे काम करणाऱ्या किंवा काम करण्यास इच्छुक असलेल्या आणि एकूण काम करणाऱ्या वयोगटातील लोकसंख्येमध्ये (१५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या) लोकांपासून बनलेले असते. कामगारांची मागणी आणि रोजगार दरांमधील या बदलत्या कलांमुळे प्रचलित आर्थिक आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि ग्रामीण आणि शहरी भागात शाश्वत वाढ सुनिश्चित करण्यासाठी विचारशील धोरणात्मक उपायांची आवश्यकता आहे. हे प्रमाण रोजगाराच्या जास्त संधी निर्माण करण्यासाठी आणि देशाची आर्थिक लवचिकता वाढवण्यासाठी आर्थिक क्रियाकलापांमध्ये विविधता आणण्याचे महत्त्व अधोरेखित करते.

आजच्या जागतिक स्पर्धेत देशाचे अस्तित्व टिकवायचे असेल आणि अर्थव्यवस्थेचा पाया अधिक रुंद आणि खोल करायचा असेल, तर फक्त सरकारी भांडवलावर अवलंबून राहता येत नाही. म्हणून सरकारी उद्योगांचे खासगीकरण आणि खासगी क्षेत्राला प्रोत्साहन देणे अत्यंत गरजेचे होते आणि आजची ती गरज आहे. सार्वजनिक क्षेत्रात एखादा उद्योग करण्यासाठी शंभर माणसांना रोजगार दिला जात असेल आणि तेच काम खासगी क्षेत्राकडे देण्यात आल्यास फार कमी माणसांमध्ये केले जाते. कामाचा दर्जाही अधिक चांगला असतो आणि अधिक कामही केले जाते; पण यामुळे काही जणांचा रोजगार मात्र जातो हे सत्य आहे. यांत्रिकीकरण ही फक्त भांडवलशहांची नव्हे, तर काळाची गरज आहे. जागतिक स्पर्धेत टिकायचे असेल तर वस्तू आणि सेवांचा दर्जा फार महत्वाचा आहे. त्यामुळे आजच्या जगात यांत्रिकीकरणाला पर्याय नाही; परंतु एक स्वयंचलित यंत्र आणले जाते, तेव्हा अनेक माणसांचा रोजगार जातो. यंत्र चालवण्यासाठी आवश्यक ते शिक्षण आणि कौशल्य असलेल्यांना नोकरी मिळते; पण शिक्षण किंवा कौशल्य नसणाऱ्यांचा रोजगार जातो. त्यांच्यासाठी नव्याने रोजगार निर्माण होण्याचे प्रमाण कमी होते किंवा त्यांना अपेक्षित रोजगार मिळत नाही. आता तरुणांच्या हाताला काम नाही आणि उद्योगपती म्हणतात, त्यांना अपेक्षित मनुष्यबळ मिळत नाही. या दोन्ही गोष्टी एकाच वेळी खऱ्या असतील, तर त्याचा सोपा अर्थ आहे की तरुणांनी फक्त पदव्यांचे कागद मिळवले आहेत आणि खऱ्या अर्थाने रोजगाराभिमुख शिक्षण घेतलेले नाही. शिक्षण प्रक्रियेतील ही त्रुटी दूर करण्याचे आव्हान देशासमोर आहे.

आजकाल

# रतन टाटा- सामाजिक भान जपणारा उद्योगपती

पराग पाटील

रतन टाटांशी माझी पहिली भेट लिफ्टमध्ये झाली. तेव्हा मी ज्युनिअर कॉलेजचा विद्यार्थी होतो. तसा लहानच. रिझर्व्ह बँकेच्या फोर्टमधल्या इमारतीत १९ व्या मजल्यावर वैयक्तिक कामासाठी वडिलांना भेटायला गेलो होतो. दुपारची वेळ होती. काम संपल्यावर वडिलांचा निरोप घेऊन मी निघालो. विभागातून बाहेर पडताना बहुधा दिशा चुकली असावी. पण त्या काळात सुरक्षिततेचे नियम इतके कठोर नव्हते. मी एका लिफ्टच्या समोर जाऊन खाली जाण्याचं बटन दाबलं. त्या ऑटोमॅटिक लिफ्टचा दरवाजा उघडला. पाहिलं... निळ्या सूटमध्ये उद्योगपती रतन टाटा होते. मी अभावितपणे आत पाऊल टाकत होतो आणि त्यांना पाहून माझे रिफ्लेक्सेस थबकले. त्यांच्यासोबत आरबीआयचे सिक्युरिटी पर्सन होते. त्यांनी 'आत येऊ नकोस' अशा अर्थाने हात केला. पण तेवढ्यात रतन टाटा म्हणाले... लेट हिम कम. मी हरखलो. आत कोपऱ्यात जाऊन उभा राहिलो. टाटांनी तेवढ्यात आस्थेने व मार्दवपूर्ण आवाजात माझं नाव विचारलं. मी सांगितलं. त्यांच्याशी आणखी काही बोलण्यासाठी शब्द जुळवेपर्यंत काही सेकंद संपले आणि लिफ्ट तळमजल्यावर आली. त्यांनी हलकेच माझ्या खांद्यावर थोपटलं आणि ते पुढे निघून गेले. इतक्या मोठ्या उद्योगपतीचं इतक्या सहजपणे माझ्याशी बोलणं हे मला खूप भारी वाटलं. त्या क्षणापासून मी त्यांचा फॅन झालो.

त्यानंतर पत्रकारितेच्या जीवनात कर्नाटक-तमिळनाडू बॉर्डरजवळच्या होसूरची टायटनची फॅक्टरी पाहायला गेलो होतो. फॅक्टरी पाहून झाल्यावर जेवणाच्या आधी अचानक रतन टाटा तिथे आले. त्यांनी आम्हा पत्रकारांशी थोड्या गप्पा केल्या. चला आपण जेवायला जाऊ असं ते म्हणाले. आम्हा पोटार्थी पत्रकारांना वाटलं टायटन कंपनीच्या कॅण्टीनमध्ये जेवण्याऐवजी साक्षात रतन टाटा आपल्याला कुठे तरी पंचतारांकित जेवण देतील. पण रतन टाटा उठले आणि कॅण्टीनच्या कोपऱ्यातून त्यांनी साऱ्याचं स्टिलचं ताट उचललं. त्यांच्या मागोमाग आम्ही. त्यानंतर रतन टाटा सहजपणे कामगारांच्या रांगेत उभे राहिले. त्यांच्या समोरच्या कर्मचाऱ्याने मागे वळून बघितलं. त्याने पाहिलं की कंपनीचा मालक आपल्या मागे उभा आहे. त्या कर्मचाऱ्याने फक्त हसून अभिवादन केलं. तुम्ही मालक आहात म्हणून तुम्ही रांगेत पुढे व्हा, वगैरे असं कोणी काही बोललं नाही. ते त्यांच्यासाठी नेहमीचं असावं.

रतन टाटांचा नंबर आला तेव्हा त्यांनी आपलं जेवण वाढून घेतलं. आम्हीही वाढून घेतलं आणि पुन्हा एका टेबलावर गप्पा मारायला ते आमच्यासोबत बसले. त्यावेळी टायटनच्याच फॅक्टरीत सोन्याच्या पत्र्याने मढवल्या जात असलेल्या टाटा नॅनो गाडीबद्दल मी एक प्रश्न त्यांना विचारला. सर्वसामान्यांसाठी असलेल्या टाटा नॅनोला महागड्या सोन्याचा वर्ख का, अशा अर्थाचा तो प्रश्न होता. त्यावेळी त्यांनी सर्वसामान्यांच्या मनात नॅनो आणि सोन्याबद्दल असलेल्या भावनेची सांगड कशी घातली गेली याचं विवेचन केलं होतं. ते प्रमोशन नॅनोचं नव्हतं तर टायटनने भारतीय सुवर्णालंकारांच्या पाच हजार वर्षांच्या ऐतिहासिक वाटचालीचा उत्सव साजरा करण्याचं ठरवलं होतं. अर्थात यात नॅनोचंही प्रमोशन झालंच. रतन टाटांच्या साधेपणातलं मोठेपण उमजत जाणं, ही आयुष्यभरातली एक सुंदर आणि निरंतर प्रक्रिया होती. सार्वजनिक जीवनात साधेपणाचं सोंग घेणारे तसे खूप लोक पत्रकारितेच्या कारकीर्दीत भेटतात. पण रतन टाटांचं जमिनीवर असणं खूप वेगळं होतं. ते दिखाऊ नव्हतं.

नैतिकतेचं मोठं बळ टाटांकडे होतं. आणि त्यासाठी पक्की वैचारिक बैठक लागते. राज ठाकरे यांनी समर्थांचे शिवरायांसाठीचे शब्द घेऊन रतन टाटांनाही आधुनिक श्रीमंत योगी म्हटलं ते समर्पक आहे. कारण नैतिकतेच्या आधारावरच त्यांचं आत्मभान उभं राहिलं होतं. ते भान विश्वासार्हतेचं होतं. विश्वासार्हतेला त्यांनी आयुष्यात सर्वोच्च स्थान दिलं. घाम आणि अश्रू दोन्हींची किंमत त्यांनी विश्वासार्हतेसाठी मोजली. बऱ्याचदा लोक सामाजिक काम करतात ते उत्तरदायित्व किंवा समाजाचं देणं अशा देण्या-घेण्याच्या मानसिकतेतून. रतन टाटांमध्ये दडलेला जो 'कर्ण' होता त्याला दानशूरतेच्या व्यवहारी साच्यात बसवता येत नाही. समाजासाठी असलेली त्यांची अंतरीची कळकळ खूप मोठी होती. नवनीतचे जितूभाई गाला यांच्यासोबत काम करत असतानाचा एक किस्सा आहे. रतन टाटांची अपॉइंटमेट घेतली तेव्हा जितूबाई स्वतःच ८२ वर्षांचे होते. भारतातल्या गरीब सामान्य विद्यार्थ्यांसाठी वैज्ञानिक प्रयोगांची ऑडियो व्हिज्युअल्स बनवायची आहेत, असं जितूभाईंनी टाटांना सांगितलं. पण तेव्हा भारतात त्या दर्जाचं ॲनिमेशन तयार करणारे लोक नव्हते. त्यामुळे रतन टाटांच्या ॲनिमेशन संस्थेने हे बनवून द्यावं, अशी गळ जितूभाईंनी टाटांना घातली. तेव्हा ही संस्था केवळ आंतरराष्ट्रीय दर्जाचीच कामं घेत होती. विशेष म्हणजे रतन टाटांनी ती मान्य केली. अतिशय दर्जेदार अशी वैज्ञानिक प्रयोगांची ॲनिमेटेड ऑडियो व्हिज्युअल्स त्यानंतर गरीब विद्यार्थ्यांसाठी बनली. आणि ही सर्वप्रथम मराठीतच बनली हेही विशेष. 'डोळ्यांचे कार्य' हे पहिलं ॲनिमेशन मी जेव्हा पाहिलं तेव्हा मला काही मिनिटांतच डोळ्याचं कार्य कसं चालतं हे कळलं. तोपर्यंत मला ते प्रत्यक्षात उमगलं नव्हतंच. विज्ञान शिकणाऱ्या सर्वसामान्य विद्यार्थ्यांसाठी एखादी गोष्ट करायची म्हणून आपली महागडी यंत्रणा सहज वापरू देणं, तेही इतक्या विनासायास ही गोष्ट रतन टाटांच्या बाबतीतच होऊ शकते.

टाटांची वीज अनेक शासकीय तसेच पालिका रुग्णालयांसाठी अतिशय कमी दरात उपलब्ध असते. कारण टाटांनी वीज उत्पादनात खूप क्रांतिकारी पाउलं उचलली आहेत. नवीनीकरण ऊर्जेत पवन आणि सौर दोन्ही क्षेत्रात टाटांनी बाजी मारली आहे. औष्णिक तसेच जलविद्युत ऊर्जा निर्मितीत टाटा प्रथमपासून आघाडीवर होते. मात्र दरम्यानच्या काळात वीजनिर्मितीत अनेक स्पर्धक उद्योग समूह उतरले. त्यांनी वीज उत्पादनात गुंतवणूक करण्याऐवजी टॅरिफ फरकावर नफा मिळवण्याची नीती ठेवली. नैतिक अधिष्ठानाने व्यवसाय करणाऱ्या टाटांकडे अर्थातच रुग्णालये अधिक आशेने पाहतात. मात्र स्पर्धक कंपन्यांनी टाटा वीज कंपनीवर रुग्णालयांचे हे वीजदर वाढवण्यासाठी दडपण आणायला सुरुवात केली. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग पुढील वर्षी रजत महोत्सव साजरा करणार आहे. पण गेल्या २४ वर्षांत प्रथमच त्यांनी वीजदर वाढवण्यासाठी दडपण आणलं. टाटा वीज कंपनीने हे दडपण झुगारून न्यायालयात जाऊन निर्णयाविरुद्ध स्थगिती मिळवली. रुग्णालयांकडून लाखो युनिट वीज दरमहा वापरली जाते. त्यांच्या युनिटच्या वीजदरात एक रुपयांचा फरकही लाखो रुपयांचा खर्च वाढवू शकतो. टाटांनी हे सामाजिक भान व्यवसायातही जपलेलं आहे. म्हणूनच रतन टाटांना देवासमान मानणारे अनेक रुग्ण आपल्याला भेटतात. रतन टाटांमधल्या उद्योगपतींपेक्षाही त्यांच्यातला कर्ण मोठा होता. पण त्या दानाचा त्यांनी कधी उत्सवी सोहळा होऊ दिला नाही. रतन टाटा नामक कर्णाच्या रथाचं चाक कधी कुठे रुतलं नाही. कारण रतन टाटांनी मानवतेच्या चाकावर उद्यमशीलतेचं रांजण उभं केलं. आता रतन टाटा काळाच्या चक्रात अज्ञाताच्या वाटेवर पुढे कुठेतरी गेले आहेत. त्यांच्या मानवतेच्या रांजणात पाणी कमी पडू न देण्याचं भान आपल्यालाच ठेवावं लागेल.

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**१४ ऑक्टोबर**

**१९०३ :-** कवी, वृत्तपत्रकार बळवंत जनार्दन करंदीकर यांचे निधन. 'प्रेमालेख्य' हे त्यांचे खंडकाव्य. त्यातील नायिका प्रेमाला प्रेमाचे सर्वश्रेष्ठ बंधन असताना त्याला विवाहाच्या बंधनात अडकवण्याची गरज का? असा रोकडा सवाल केल्याने गाजली. विद्यार्थ्यांसाठी त्यांनी ५५० आर्यांचे 'सुवर्णरत्न' हे नीतिबोधपर काव्य आणि 'कादंबिनी' हा काव्यसंग्रह प्रकाशित. त्यांच्या काही कविता आत्मनिष्ठ असून त्यातील एकाकीपणा, जीवनाबद्दलचा कडवटपणा, औदासिन्य मनाला चटका लावणारे आहे. **१९०७:-** कवी श्रीपाद नारायण मुजूमदार यांचे निधन. 'मोहनतारा' व 'हंसदूत' ही खंडकाव्य पुस्तकरुपात, तर छत्रपती षिवाजी महाराज', 'सुभद्राविवाह काव्य' ही महाकाव्य काव्यरत्नावलीतून प्रसिध्द. याशिवाय 'वीरमती द्रौपदी', 'कपटविपाक', 'वसंतचंद्रिका', 'दषरथ निधन' आदी स्फूट प्रकरणे त्यांनी रचली. **१९३०:-**अर्थशास्त्राचे जाणकार, लेखक डॉ. मधुसूदन अनंत चान्सरकर यांचा जन्म. 'मुद्रा व नियोजन', 'भगवद्गीते तील अर्थषास्त्र', 'गीताप्रणित अर्थरचना', 'सप्तसागरातील श्रीलंकेचा शोध' अशी ग्रंथ संपदा. 'युगवाणी' या नियतकालिकेच्या संपादन मंडळावर ते कार्यरत होते. **१९३२:-** कथा-कादंबरीकार मनोहर मारोतीराव मल्हार यांचा जन्म. 'माणुस' ही त्यांची गाजलेली कादंबरी. याशिवाय 'अप्रिया', 'अफलातून', 'अशरीरी' या कादंबऱ्या प्रकाषित. 'श्वेतांबरी' या संग्रहात त्यांच्या कविता संग्रहित. 'बुढीचं खाटलं', 'गोरीमोरी', 'कॅन्सल', 'नि:संग' हे कथासंग्रह प्रसिद्ध. मोजकेच पण वैशिष्ट्यपूर्ण लेखन करणारे लेखक असा नावलौकिक. 'मी एक बुजगावणं' हे नाटकही त्यांच्या नावावर आढळते. **१९३४:-** लेखक, वक्ते, इतिहासकार, भाषांतरकार, भगवत्गीतेचे टीकाकार, विचारवंत, सुधारक, सामाजिक कार्यकर्ते आणि ब्राह्मणेतर चळवळीचे आधारस्तंभ गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर यांचे निधन. **१९३५:-** लेखक रामचंद्र शंकर टाकी यांचा जन्म. अध्यात्मक व तत्त्वज्ञान हे त्यांच्या लेखनाचे विषय. मोक्षप्राप्तीच्या साधनांचा ऊहापोह करणारा 'पुरुषार्थदीपिका' या ग्रंथातून त्यांच्या व्यासंगाची क्षमता लक्षात येते. तसेच 'श्रीज्ञानेश्वर महाराज' अथवा 'सद्भक्तिविजय' या ग्रंथातून ज्ञानेवरांवर त्यांनी दिलेली प्रवचने समाविष्ठ. याशिवाय इंग्रजीतूनही त्यांनी लेखन केले आहे. **१९३६:-** कादंबरीकार, विनोदी लेखक सुभाष भेंडे यांचा जन्म. साहित्य संमेलनाचा खर्च भागविण्यासाठी महाकोष उभारण्याची कल्पना त्यांनी मांडली. डिसेंबर २०१० मध्ये त्यांचे निधन झाले. **१९४२:-** वेद, वेदांत, न्याय, अलंकार, धर्मशास्त्र, यंत्रशास्त्र, फलज्योतिष आदी विषयांचे अभ्यासक लेखक महामहोपाध्याय वासुदेवशास्त्री महादेवशास्त्री अभ्यंकर यांचे निधन. पतंजलीच्या व्याकरण महाभाष्याचे भाषांतर या अनमोल ग्रंथाशिवाय संस्कृत-मराठीत स्वतंत्र ग्रंथ, संपादित ग्रंथ टीपा टिप्पणी, भाषांतर या स्वरुपाचे पुष्कळ लेखन त्यांनी केले. **१९४७:-** साहित्यसम्राट' न. चिं. केळकर यांचे निधन. 'तोतयाचे बंड' सह १० नाटके, ८ कादंबऱ्या, दोन पद्यसंग्रह, 'इंग्रज व मराठे' हे इतिहासकथन, लोकमान्य टिळकांचे त्रिखंडात्मक चरित्र, 'माझी जीवनयात्रा' (आत्मचरित्र) आणि स्फुटलेखन मिळून १५ हजार पानी, २४ खंडांचे त्यांचे समग्र साहित्य आहे. **१९५२:-** लेखिका डॉ. निलिमा माधव गुंडी यांचा जन्म. ह्यांच्या साहित्य संपदेत 'आभाळाचा फळा', 'कानामात्रा', 'रंगांचा थवा', 'दुधाचे दात' हे बालकाव्यसंग्रह तर 'वाऱ्यावर स्वार', 'देवमासा' हे बालकथासंग्रह तसेच 'स्पर्षरेषा', 'प्रकाशाचे अंग' हे काव्यसंग्रह. याशिवाय 'शब्दांची पहाट', 'अक्षरस्पंदन', 'भाषाभान' हे ललित लेखसंग्रह, 'लाटांचे मनोगत' हा काव्यविषयक लेखसंग्रह आणि 'मराठी वाङ्मय कोश', 'अक्षरवेल', 'युवकभारती' आदी ग्रंथाच्या संपादनात त्यांचा मोलाचा सहभाग होता. **१९५३:-** कुटुंबनियोजनाचे आद्य महाराष्ट्रीय प्रसारक व या कार्यासाठी 'समाजस्वास्थ्य' हे मासिक चालविणारे रघुनाथ धोंडो कर्वे यांचे निधन. त्यांचे अप्रकाशित लेखांचे आठ खंड अलिकडेच प्रकाशित झाले. **१९९८:-** नाट्यलेखक नानासाहेब षिरगोपीकर यांचे निधन. **२००५:-** बुध्दिप्रामाण्यवादी, नवमानवतावादी विचारवंत आणि पत्रकार-संपादक द्वारकादास भगवंत कर्णिक यांचे निधन. मानवेन्द्रनाथ रॉय यांच्या अनेक पुस्तकांचे अनुवाद त्यांनी केले. 'गांधीवादाचे समर्थन','संपादकाचे जीवनस्वप्न','वृासाधना' ही त्यांची काही पुस्तके.

**- संजय वझरेकर**
**९७५५७६६७५**

# परतीच्या पावसाचा भात पिकाला फटका

## शेतकरी हवालदिल, पंचनामे करण्याची मागणी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अवेळी पावसामुळे रायगड जिल्ह्यातील भातशेती पाण्याखाली गेली आहे. त्यामुळे भात उत्पादक शेतकऱ्यांचे फारे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. जिल्ह्यात काही दिवसांपासून कापणी सुरू झाली आहे. भात तयार झाल्याने त्याची चार दिवसात कापणी आवश्यक आहे. मात्र, या पावसाने पीक आडवे पडले आहे. शेतात मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने भाताला अंकुर येण्याची शक्यता आहे. मागील सहा दिवसांपासून हा पाऊस सायंकाळी पडतो. यामुळे भात कापणीत अडथळे येतात.

जिल्ह्यात दरवर्षी परतीचा पाऊस होवून भातपीक वाया जाते. त्यामुळे शेतकरी वर्गाचे मोठे नुकसान होत आहे. मुसळधार पावसाने जिल्ह्यातील अनेक भागात दाणादाण उडवली. गेल्या चार-पाच दिवसांपासून काही भागात जोरदार पाऊस पडत आहे. सततच्या पावसामुळे भातपीक काळे पडून कुजण्याची शेतकऱ्यांनी भीती व्यक्त केली आहे. काही पिकांवर रोगराईचा प्रादुर्भाव दिसून आला आहे. या आस्मानी संकटामुळे शेतकऱ्यांचा हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. बळीराजा पुन्हा एकदा संकटात सापडला आहे. जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून विजेच्या कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यासह पाऊस सुरू आहे. त्याचा फटका कापणीला आलेल्या भात पिकाला बसला आहे. भात पिकांच्या शेतात पाणी भरून राहिल्याने भात पीक काळे पडून कुजण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली असून या वर्षी हातातोंडाशी आलेले चागले भात पीक खराब होऊन मोठे नुकसान होणार आहे. त्यामुळे बळीराजा संकटात सापडला आहे. जिल्ह्यात सहा दिवस परतीच्या पावसाने धुम ाकूळ घातला आहे. भात पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. कृषी खात्याने तातडीने पंचनामे करावे, अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे. हजारो हेक्टर क्षेत्रावर पिकांना फटका बसला असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. जिल्ह्यात परंपरागत भातशेती केली जाते. अनेक शेतकरी जूनच्या पहिल्या, दुसऱ्या आठवड्यात भात पेरणी करतात. त्यामुळे लावणी जुलै महिन्यात येते व सप्टेंबर, ऑक्टोबरमध्ये कणसे येऊन नोव्हेंबरच्या शेवटी कुठे भात कापणी होते. यंदा जूनमध्ये भात पेरणी केलेल्या शेतकऱ्यांना जुलैमधील मोठ्या प्रमाणात बरसलेल्या पावसाचा फटका बसला. मोठ्या प्रमाणात भातशेती कुजली आणि त्यातून सावरलेली भातशेती चांगली होती. मात्र, जर परतीच्या पावसाचा जर येत्या काळात जोर वाढला तर पुन्हा शेतीवर अस्मानी संकट सावट येईल, अशी भीती असल्याने शेतकरी चिंतेत आहेत.

सरकार आणि प्रशासनाने नुकसानीचे पंचनामे तातडीने करण्याची मागण होत आहे.



सुमारे ९५ हजार हेक्टरवर यंदा भात लागवड करण्यात आली. हजारो हेक्टर क्षेत्र सध्या सर्वाधिक डेंजर झोनमध्ये आहे. हे पिक २०-२५ दिवसांपूर्वीच तयार झाले होते. मात्र, पावसामुळे कापता आले नव्हते. परतीच्या पावसाने ते मोठ्या प्रमाणात आडवे झाले आहे. आताच्या घडीला सुमारे ७५ ते ८० टक्के भातपिक तयार होण्याच्या अवस्थेत आहे. पाऊस असाच सुरु राहिला तर नुकसानीची तीव्रता आणखी वाढणार असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

काही दिवसांपासून जिल्ह्यात परतीचा पाऊस पडत असल्याने शेतकऱ्यांच्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. आम्ही कृषी विभागातर्फे नुकसान भागाची पाहणी करणार आहोत. तलाठी, ग्रामसेवक ग्रामस्तरावर नुकसानग्रस्त भागाची पाहणी करणार आहेत. त्यानंतर नुकसानग्रस्त भात पिकांची पाहणी करून शासनाकडे अहवाल पाठवला जाईल, असे कृषी विभागातील सूत्रांनी सांगितले.

> यंदा पाऊस चांगला झाल्याने भात पीक चांगले होते. अनेक शेतकऱ्यांनी हजारो रुपयांचे भात विकत घेऊन लागवड केली होती. भात पीकही चांगले आले होते. मात्र, परतीच्या पावसाने भात पिके आडवे होऊन नुकसानीची शक्यता आहे. भाताच्या दाण्याला मोड येण्याची शक्यता तसेच ते कुजण्याची शक्यता आहे. त्यामुळे भात उत्पादनावर परिणाम होणार असून शासनाने त्वरित पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी.- दिनेश सोडवे, शेतकरी.

# पावसामुळे भाजीपाल्याचे नुकसान; आवक मंदावली

## बाजारात भाज्यांना मागणी वाढली

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

नवरात्रोत्सवात घरोघरी होणाऱ्या उद्यापने आणि व्रतवैकल्यामुळे शाकाहाराला अधिक पसंती आहे. पालेभाज्यांना मागणी वाढल्यामुळे दर वधारले आहेत. बहुतांश भाज्यांनी शंभरी ओलांडली असून, टोमॅटो व कांद्याची साठी तर बटाट्यानींही पन्नाशी पार केली आहे. दरवाढीमुळे ग्राहकांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. जिल्ह्यात नवरात्रोत्सवाला प्रारंभ झाल्या नंतर या दिवसात सात्विक शाकाहार घेतला जातो. यामुळे या दिवसात भाज्यांना मागणी वाढते; मात्र, पावसामुळे पिकाचे नुकसान झाल्याने जिल्ह्यात भाजीपाला आवक मंदावली आहे.



त्यातच सणवार असल्यामुळे भाज्यांना मागणी वाढली आहे. त्यामुळे दरवाढ झाली असल्याचे सांगण्यात येते. टोमॅटो, हिरवी मिरची, कोबी, वांगी, फ्लॉवर, पावटा, गाजर, घेवडा, फरसबी, गवार, सिमला मिरचीसह मुळा, माठ, पालक, शेपू, मेथी या पालेभाज्यांचीही वाढ झाली आहे. बाजारात नवीन बटाट्याची आवक होत असून, ४०-५० रुपये किलो दराने विक्री सुरू आहे. लसणाचे दर अद्याप तेजीतच आहेत. लसूणबरोबरच कांद्यानेही दरात पुन्हा उसळी घेतली असून, २५० ते ४०० रुपये किलो दराने लसणाची विक्री सुरू आहे. कांदा ६० रुपयेदराने विकला जात आहे. काही भागात ओला कांदा ३५ ते ४० रुपये दराने विकला जात आहे. पावसाचे दिवस असल्यामुळे गृहिणींचा सुका साठवणुकीचा कांदा घेण्याकडे कल आहे; मात्र कांद्यांचे दर वाढले असल्याने तूर्तास किरकोळ खरेदी करून समाधान मानावे लागत आहे..

# नवरात्रात ऐतिहासिक देखावे आकर्षण ठरले

**। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।**

मुरुड श्रीकृष्ण मंडळ मुरुड जंजिरा कोळीवाडा यांनी इतिहास काळातील लायजी सरपाटील यांचा जंजिरा जिंकण्यासाठी एक आरमारी डाव फसला, मोरोपंतांची सैन्य, दारूगोळा रसद घेऊन जाणारी कुमक किल्ल्यापाशी वेळेवर पोहोचलीच नाही. तरिही छत्रपती शिवाजी महाराजांनी लायजीच्या बहादुरीचा सन्मान करून त्यास पालखीचा मान, छत्री, निशाण व सरपाटील पदवी देऊन सन्मानीत केले. हा देखावा साकारला असल्याने नवरात्रात आकर्षण बनला होता. सदर डेकोरेशन श्रीकृष्ण मंडळ मुरुड जंजिरा कोळीवाडा यांनी केले आहे. संकल्पना गजानन सरपाटील, सजावट संतोष बळी, महेंद्र, उदेश, मिलिंद, सोमनाथ, गणेश, मयूर आणि कार्यकर्ते, मूर्तिकार निलेश साळुंखे हे आहेत. दरम्यान, अशाच पद्धतीने प्रबोधन व्हायला हवे आणि इतिहास पुढे सरकायला हवा असा कोळी बांधवचं मानस आहे. देखावा पाहण्यासाठी ९ दिवस गर्दी झाली.



# ११ ऑक्टोबरपासून भूखंड विक्रीला सुरुवात

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

म्हाडाच्या कोकण मंडळाने सहा ते सात हजार घरांची सोडत काढण्याची तयारी सुरू केली होती. मात्र, कोकण मंडळाने गुरुवारी केवळ १,३२२ घरांसह ११७ भूखंडांच्या विक्रीसाठी जाहिरात प्रसिद्ध केली आहे. घरांची संख्या खूप कमी असून यात २० टक्के सर्वसमावेशक योजनेसह म्हाडाच्या कोकण मंडळाच्या गृहनिर्माण योजनेतील घरांचा समावेश आहे. जाहिरातीनुसार आता शुक्रवार, ११ ऑक्टोबरपासून या घरांसह भूखंडांच्या विक्रीसाठीच्या अर्ज विक्री स्वीकृती प्रक्रियेस सुरुवात झाली आहे. ही प्रक्रिया पूर्ण करून २७ डिसेंबर रोजी म्हाडाच्या मुख्यालयात सोडत काढण्यात येणार आहे.

आचारसंहितेच्या आधी म्हाडाच्या विविध विभागीय मंडळांनी सोडत जाहीर कराव्या यासाठी राज्य सरकार आग्रही होते. सोडतीद्वारे मतदारांना आकर्षित करण्यासाठी विशेष करून मुंबई आणि कोकण मंडळाच्या सोडतीसाठी सरकार आग्रही होते. त्यानुसार नुकतीच मुंबई मंडळाच्या २,०३० घरांसाठीची सोडत काढण्यात आली. ही सोडत पार पडताच कोकण मंडळाने १,३२२ घरासंह ११७ भूखंडांच्या विक्रीसाठी गुरुवारी जाहिरात प्रसिद्ध केली. आचारसंहितेपूर्वी अर्ज विक्री-स्वीकृती प्रक्रियेस सुरुवात करण्यासाठी कोकण मंडळाची धावपळ सुरू होती.




त्यानुसार गुरुवारी १,३२२ घरांसह ११७भूखंडांच्या सोडतीसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली. दरम्यान आतापर्यंत ६ ते ७ हजार घरांसाठी सोडत काढली जाणार असल्याचे मंडळाकडून सांगितले जात होते. पण प्रत्यक्षात मात्र केवळ १,३२२ घरांसाठीच सोडत जाहीर करण्यात आली आहे. सोडतीमध्ये पंतप्रधान आवास योजनेसह २० टक्के आणि म्हाडा गृहनिर्माण योजनेतील रिक्त घरांचा समावेश करण्यात येणार होता. मात्र ती घरे आता प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य योजनेत समाविष्ट करून त्यासाठी स्वतंत्र जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यामुळे कोकण मंडळाची मूळ सोडत केवळ १,३२२ घरांसाठीच असणार आहे. या १,३२२ घरांसह ११७ भूखंडांच्या सोडतीसाठी शुक्रवारी दुपारी १२ वाजल्यापासून अर्ज विक्री-स्वीकृतीस सुरुवात झाली आहे. तर अनामत रकमेसह अर्ज सादर करण्यास दसऱ्याच्या दिवशी, शनिवारी १२ ऑक्टोबरपासून सुरुवात झाली आहे.

### सोडतीचे वेळापत्रक

* नोंदणी, अर्ज विक्री-स्वीकती शुक्रवारी (११ ऑक्टोबर) दुपारी १२ वाजल्यापासून
* अर्ज विक्रीची शेवटची मुदत १० डिसेंबर रात्री ११.५० वाजेपर्यंत
* संगणकीय पद्धतीने अनामत रकमेसह अर्ज स्वीकृतीस सुरुवात १२ ऑक्टोबर दुपारी १२ वाजल्यापासून
* संगणकीय पद्धतीने अनामत रकमेसह अर्ज स्वीकृतीची शेवटची मुदत ११ डिसेंबर रात्री ११.५९ वाजेपर्यंत
* आरटीजीएस वा एनईएफटीअंतर्गत अनामत रकमेसह अर्ज स्वीकृतीची शेवटची मुदत ११ डिसेंबर बँकेच्या कार्यालयीन वेळे दरम्यान, सोडतीची तारीख २७ डिसेंबर, सकाळी १० वाजता

# ताम्हाणे शाळेत सीसीटीव्ही कार्यान्वित

**संगमेश्वर :** प्रसिद्ध उद्योजक आणि देवधामापूरचे ग्रामस्थ सुनील सप्रे यांनी माध्यमिक विद्यामंदिर ताम्हाणे या शाळेत सीसीटीव्ही बसवण्यासाठी आर्थिक मदत केली. या यंत्रणेचे उद्घाटन सुनील सप्रे यांच्या पत्नी मोहिनी आणि भगिनी नीता पाटणकर यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थी सुरक्षा महत्वाची मानून सुमारे एक लाख रुपयांचे सीसीटीव्ही भेट दिल्याबद्दल मुख्याध्यापक मारूती चोरमाले यांनी आभार मानले. या प्रसंगी सहाय्यक शिक्षक युवराज कांबळे, कदम, सर्व शिक्षक उपस्थित होते.

# गणवेश ठरताहेत शिक्षकांची डोकेदुखी

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

राज्य शासनाच्या धोरणाप्रमाणे प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, पाठ्यपुस्तके, पोषण आहार मोफत देण्यात येतो. यंदा गणवेशासाठीचे कापडही दर्जेदार नाही. अंदाजे कपडे शिवल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना कपडे छोटे होत आहेत, तर काहींना ते खूपच मोठे होत आहेत. त्यामुळेच शिक्षकांची डोकेदुखी वाढली असून, पालकांनाही त्रास सहन करावा लागत आहे. मागील तीन वर्षांपासून जिल्हा परिषद, पंचायत समितीसह नगरपालिका, महानगरपालिका निवडणुका झालेल्या नाहीत. मुदत संपल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्रशासक नेमले आहेत. लोकप्रतिनिधी नसल्याने अधिकाऱ्यांच्या मनमानीपणाचा आणि दुर्लक्षाचा थेट फटका विद्यार्थ्यांना बसत आहे. यापूर्वी प्रतिवर्षी शाळेच्या पटसंख्येप्रमाणे प्रत्येकी दोन गणवेशाचे प्रत्येकी ३०० रुपयांप्रमाणे एकूण रक्कम शाळा व्यवस्थापन समितीच्या खात्यावर जमा होत होती. ही रक्कम जमा झाल्यानंतर शाळा व्यवस्थापन समिती व मुख्याध्यापक कापडाची गुणवत्ता पाहून ते कापड खरेदी करत तसेच प्रत्येक विद्यार्थ्यांचे माप घेऊन त्या मापात कपडे शिवून घेतले जात होते. स्वातंत्र्यदिनापूर्वी विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वाटप होत होते; मात्र चालू वर्षी मात्र शिक्षण मंत्रालयाने संपूर्ण बदलाचे धोरण स्वीकारून राज्यपातळीवर हे काम कुणावर तरी सोपवले असावे आणि त्या यंत्रणेने रेडिमेड व्यापाऱ्याप्रमाणे सरासरी माप ग्राह्य धरून अत्यंत हलक्या दर्जाचे कापड व निकृष्ट शिलाई असलेले गणवेश विद्यार्थ्यांना दिले आहेत. काही गणवेश उसवलेले आहेत. त्यामुळे सावळागोंधळ झाला आहे. पालकांमध्ये नाराजी पसरली असून, शिक्षकांची डोकेदुखी वाढली आहे.



> विद्यार्थ्यांची गैरसोय होत असेल तर त्याचा जाब आम्ही प्रशासनाला विचारणार आहोत. गणवेश तयार करण्यासाठी शाळास्तरावर परवानगी मिळवण्यासाठी प्रयत्न करणार आहोत.
> - संतोष थेराडे, माजी अध्यक्ष, जिल्हा परिषद

# बचतगटांनी केली १० कोटींची उलाढाल

**। राजापूर । वृत्तसंस्था ।**

महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नत्ती अभियानांतर्गत (उमेद) राजापूर तालुक्यात १ हजार ६७१ बचतगटांची स्थापना झाली आहे. त्यातून २२ हजार महिला संघटित झाल्या असून, त्यांनी छोटे-मोठे उद्योग-व्यवसाय सुरू केले आहेत. वर्षभरामध्ये सुमारे दहा कोटी रुपयांची उलाढाल होते. या उद्योगांमुळे महिलांच्या उदरनिर्वाहाचे साधन तयार झाले आहे. या अभियानाद्वारे महिला संघटित झाल्या असून त्यांना स्वयंरोजगाराचे धडे मिळत आहेत. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचे रूपांतर राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानात झाले. १ एप्रिल २०१८ पासून राज्यात कार्यान्वित झालेल्या उमेद अभियानात महिलांना संघटित करून सहकाराच्या धर्तीवर बचतगट गठित केले जात आहेत. गरीब आणि जोखीमप्रवण कुटुंबांना समृद्ध, आत्मसन्मानाचे आणि सुरक्षित जीवन जगता यावे या दृष्टीने प्रयत्न करण्याचा उद्देश उमेद अभियानात ठेवण्यात आला आहे. या अभियानांतर्गत तालुक्यामध्ये १ हजार ६७१ बचतगटांची स्थापना झाली. त्यातून, २२ हजार १२० महिला संघटित होताना हजारो कुटुंबे एकमेकांशी जोडली गेली आहेत. सहकाराच्या धर्तीवर बचतगटाच्या माध्यमातून गठित झालेल्या या महिलांनी हळद लागवड, चारसुत्री पद्धतीने सामुदायिक भातशेती करणे यासह दिवाळीचा फराळ तयार करणे, कुक्कुटपालन, भाजीपाला तयार करून विक्री यांसह घरगुती उत्पादने तयार करणे आदी व्यवसाय करत आहेत. गणेशोत्सवात अनेक बचतगटांच्या महिलांनी गणेशभक्तांकडून मागणी असलेले मोदकही तयार करून विक्री केले होते. कोरोना महामारीत बचतगटाच्या महिलांनी मास्क तयार करून त्याची विक्री केली होती. त्यामधून लाखो रुपयांची उलाढाल केली. त्यासाठी त्यांना तालुका उमेद विभागाचे महत्वपूर्ण मार्गदर्शन लाभत आहे तर विविध बँकांनीही आर्थिकदृष्ट्या हातभार लावला.

**दृष्टिक्षेपात राजापूर- उमेद**
बचतगट : १६७१- बचतगट
कार्यरत महिला : २२ हजार- कुटुंबे : २२ हजार-
वार्षिक उलाढाल : सुमारे १० कोटी रुपये



## दिव्यांगत्वावर मात करत बनली संगणक प्रशिक्षक

# ऋणालीच्या जिद्दीला सलाम

**। साखरपा । वृत्तसंस्था ।**

अंगभूत कला असेल आणि मनात जिद्द असेल तर कोणत्याही अडचणींवर मात करता येते, हे ऋणाली बडद हिने दाखवून दिले आहे. पूर्णपणे कर्णबधीर आणि मूकबधीर असलेली ऋणाली ही आज संगणक प्रशिक्षण घेऊन स्वत:च्या पायावर उभी आहे. रत्नागिरीची ऋणाली ही जन्मापासून कर्णबधीर आणि मूकबधीर आहे. दहावीपर्यंत तिचं शिक्षण रत्नागिरीतल्याच मूकबधीर विद्यालयातून झाले. त्याच दरम्यान तिला चित्रकलेची आवड असल्याचे तिच्या पालकांना जाणवले. तिची आवड आणि कलाक्षेत्राकडे असलेला कल लक्षात घेऊन तिच्या वडिलांनी ऋणालीला पुण्याला चित्रकलेचा फाऊंडेशन अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी पाठवले. तो अभ्यासक्रम ऋणालीने यशस्वीपणे पूर्ण केला. त्यानंतर पुढे काय, हा प्रश्न उभा होताच. त्याचवेळी तिला संगणकाचीही आवड आहे, हे लक्षात आले.

संगणक आणि कलाक्षेत्राकडे असलेला ओढा यांची सांगड घालून ग्राफिक अँड ॲनिमेशन हा तीन वर्षांचा अभ्यासक्रम कोल्हापूरला राहून पूर्ण केला. हे शिक्षण घेताना अनेक अडचणी आल्या. ऋणालीला ऐकू येत नसल्यामुळे शिकवत असलेला अभ्यास आत्मसात कसा करून घ्यायचा, हा प्रश्न तिच्यापुढेही होता आणि तिच्या शिक्षकांपुढेही होता; पण ऋणालीसारख्या जिद्दी आणि हुशार विद्यार्थिनीला शिकवण्याचे आव्हान शिक्षकांनीही स्वीकारले. सुरवातीला चार-सहा महिने अनेक अडचणी आल्या; पण नंतर हळूहळू सराव झाला आणि ऋणालीने तो अभ्यासक्रम प्रथम क्रमांकाने पूर्ण केला. ऋणाली रत्नागिरी इथे ग्राफिक डिझाईनर म्हणून काम करते. तिने सुरुवातीला शिवम साळवी यांच्या हाताखाली काम करायला सुरवात केली. रत्नागिरीतील अनेक सोने व्यावसायिकांच्या दुकानाच्या जाहिराती तिने स्वत: तयार करून दिल्या आहेत. त्या अतिशय चांगल्या असल्याने तीच्या कामाचे कौतुक झाले आहे. दरम्यान, ऋणालीने दाखवलेली जिद्द तिला आता सर्वोच्च शिखरावर घेऊन जाण्यास मदतगार ठरणार आहे. ऋणालीचा प्रवास हा अन्य मुला-मुलींसाठी खरोखरच प्रेरणादायी असाच आहे.

> ऋणाली स्वत:चा स्वतंत्र व्यवसाय सुरू करत आहे. त्याचबरोबर ती केळीच्या वाळलेल्या सोपांपासून चित्राच्या फ्रेम तयार करते. घरात लावण्यासाठी अशा फ्रेमना मोठी मागणी आहे. अशातूनच तिने तयार केलेले कवी गुरू ठाकूर यांच्या चित्राची फ्रेम आणि बच्चू कडू यांच्या फोटोवरून केलेली फ्रेम विशेष गाजली.

# शहरी आरोग्यवर्धिनी केंद्र निवखोल येथे सुरू

**रत्नागिरी :** निवखोल येथील शहरी आरोग्यवर्धिनी केंद्राचे फित कापून उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अनिरूद्ध आठल्ये, राहुल पंडित, बिपिन बंदरकर, सुदेश मयेकर, राजन शेट्ये, सुहेल मुकादम, दिशा साळवी आदींसह परिसरातील नागरिक उपस्थित होते. चांगली आरोग्यव्यवस्था असावी असे सरकारचे धोरण आहे. १२ वित्त आयोगातून नागरिकांसाठी चांगल्या पद्धतीची आरोग्य व्यवस्था केली जात आहे. नागरिकांचे आरोग्य निरोगी राहण्यासाठी या केंद्राचा निश्चितच उपयोग होणार आहे, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१४ ऑक्टोबर
१) श्रीम. हंसा शरद शेट
अलिबाग
१४-१०-१९४२
२) श्रीम. पुष्पलता गजानन हरवंदे
पिंपळभाट, अलिबाग
१४-१०-१९४४
३) श्रीम. वंदना दत्तात्रेय भोसले
मारुतीनाका, अलिबाग, १४-१०-१९५१

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

**आजचे अन्नदाते**



**स्व. कलावती भवानजी देढीया, स्मरणार्थ महावीर ट्रेडर्स बाजार पेठ अलिबाग**



**स्व. भाऊराव जयराम म्हामुणकर, स्मरणार्थ, वरसोली, अलिबाग**

# आंबेली येथे कारचा अपघात

**दोडामार्ग :** तिलारी मार्गे गोव्याच्या दिशेने प्रवास करणाऱ्या मोटारीचा आंबेली येथील एका वळणावर चालकाचा ताबा सुटल्याने अपघात झाला. मोटार थेट रस्त्याबाहेर जाऊन झाडाला आदळल्याने दर्शनी भागाचे नुकसान झाले. एअर बॅग उघडल्याने अनर्थ टळला.या अपघाताची नोंद पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, कर्नाटक येथील मोटार तिलारी मार्गे गोव्याकडे जात होती. ती आंबेली येथील एका वळणावर आली असता चालकाला वळणाचा अंदाज आला नाही. चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने भरधाव वेगात असलेली मोटार थेट रस्त्याबाहेर जाऊन झाडाला आदळली. धडक बसताक्षणी मोटारमधील एअर बॅग उघडल्या. त्यामुळे समोर बसलेल्या व्यक्ती बचावले.

मात्र, पाठीमागे बसलेल्या महिला व लहान मुलीला किरकोळ मार लागला. याच वेळी पाठोपाठ पोलिसांची गाडी येत होती. अपघात झाल्याचे पाहून पोलिसांनी अपघातात जखमी व्यक्तींना रुग्णालयात नेले. तेथे त्यांच्यावर उपचार करण्यात आले. मोटारीच्या दर्शनी भागाचे मात्र मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)


निवडक

## भात कापणी रखडली

**पाताळगंगा** : पावसाळ्यात केलेल्या भात लागवडीला उत्तम पिक आले असून सध्या काही शेतकरी बांधवांची भातपिकं कापणीला तयार झाली आहत. मात्र, परतीच्या पावसांची जोरदार बॅटिंग होत असल्यामुळे काही शेतकरी वर्गांचेही नुकसान झाले आहे. पावसांचा अंदाज आणि हवामान खात्याच्या सुचनेनुसार काही शेतकरी बांधवांनी भात कापणी थांबविली आहे. यामुळे दिवस भर उन्हाचा तडाख्यामुळे भाताच्या लोंब्यातून दाणा गळत असल्याने शेतकरी हातबळ झाला आहे.

## तळ्यात महिलांचा सन्मान

**तळा** : विधवा महिला आपल्या पतीच्या पश्चात न डगमगता खंबीरपणे आपल्या कुटुंबाची जबाबदारी खांद्यावर घेऊन ती यशस्वी रित्या पार पाडत आहेत. ही जबाबदारी पार पाडत असताना त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. मात्र, अशा अनेक समस्यांवर मात करून या महिला कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे पेलत आहेत. अशा महिलांचे मनोबळ वाढावे यासाठी तालुक्यातील संत रोहिदास नगरमध्ये नवरात्र उत्सवाचे औचित्य साधून विधवा महिलांचा उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

## हिरवळ कॉलेजला मानांकन

**माणगाव** : हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ सायन्स महाड महाविद्यालयाचे ३० सप्टेंबर आणि १ ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषदेद्वारे द्वितीय मूल्यांकन आयोजित करण्यात आले होते. यावेळी बेंगळुरूच्या विद्यापीठ अनुदान आयोगाकडून महाविद्यालयाला 'बी प्लस' मानांकन प्रदान करण्यात आले. या यशाबद्दल बोलताना दप्राचार्य सुदेश कदम यांनी कॉलेजच्या संपूर्ण टीमबद्दल अभिमान आणि कृतज्ञता व्यक्त केली.

## टीबी रुग्णांना पोषण आहार

**पनवेल** : रोटरी खारघर मिडटाऊनने खारघरमधील एका खेडेगावात २० टीबी रुग्ण आणि २० गर्भवती महिलांना पोषण आहार आणि प्रथिने पूरक आहार दान केले आहे. हा कार्यक्रम जिल्हा क्षयरोग अधिकारी सचिन जाधव, शैलेश पटेल, दिपा पटेल, डॉ. रविकिरण, अनुप गुप्ता आणि क्लबचे इतर वरिष्ठ सदस्य यांच्या उपस्थितीत पार पडला. या प्रकल्पाचा मुख्य हेतू म्हणजे गरजू क्षयरुग्णांना प्रथिनेयुक्त सप्लिमेंट्स आणि अन्नपदार्थ उपलब्ध करून देणे, जेणेकरून त्यांची पुनर्प्राप्ती जलद होईल.

## मच्छीमार सोसायटीचे उद्घाटन

**उरण** : तालुक्यातील कुंडेगाव येथे श्रीगणेश हनुमान मच्छीमार सहकारी सोसायटीचे उद्घाटन शनिवारी (दि.१२) विजयादशमीच्या शुभ मुहूर्तावर करण्यात आले. या प्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य सिताराम नाखवा, मच्छीमार कार्यकर्ते मार्तंड नाखवा, श्रीगणेश हनुमान मच्छीमार सहकारी सोसायटी संस्थेचे चेअरमन चंद्रकांत पाटील, ग्रुप ग्रामपंचायत नवघर सरपंच नितिन मढवी, सामाजिक कार्यकर्ते मनोहर पाटील व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विनापरवाना कचराकुंडीची मोडतोड

## माजी सदस्याला ग्रामपंचायतीची नोटीस; स्वतःच्या खर्चाने बांधून देण्याचे आदेश

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**नेरळ ग्रामपंचायतीची खांडा गावातील कचरा कुंडी ऐन गणेशोत्सव काळात तोडण्यात आली होती. कोणत्याही परवानगी विना तोडण्यात आलेल्या कचराकुंडीबद्दल स्थानिक ग्रामस्थांच्या तक्रारीनंतर आणि उपोषणाची नोटीस दिल्यावर ग्रामपंचायतीकडून कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. दरम्यान, नेरळ ग्रामपंचायतीने कचरा कुंडी तोडणाऱ्या माजी सदस्याला नोटीस पाठवून स्वतःच्या खर्चाने कचरा कुंडी बांधून देण्याचे आदेश दिले आहेत.**



नेरळ ग्रामपंचायत हद्दीतील ममदापूर-नेरळ रस्त्यावरील खांडा गावातील गटाराच्या बाजूला असलेली कचराकुंडी गणेशोत्सव काळात स्थानिक ग्रामस्थ आणि माजी सदस्य शंकर घोडविंदे यांनी तोडली होती. येथील पाणीपुरी वाल्याला त्रास ठरत असलल्याने ही कचरा कुंडी तोडण्यात आली होती. यासाठी ग्रामपंचायतीची कोणतीही परवानगी घेण्यात आलेली नव्हती. यावेळी स्थानिक ग्रामस्थ सुभाष नाईक यांनी आक्षेप घेतला होता. मात्र, त्यांना न जुमानता घोडविंदे यांनी सोबत असलेल्या कामगारांच्या मदतीने कचराकुंडी तोडली. यानंतर सुभाष नाईक यांनी ग्रामपंचायतीत तक्रार दाखल केली होती. परंतु, या तक्रारीला ग्रामपंचायतीकडून कोणताही प्रतिसाद मिळत नसल्यामुळे नाईक यांनी त्याच जागी कचराकुंडी बांधावी, तसेच विना परवाना कचराकुंडी तोडणाऱ्यावर कारवाई व्हावी, या मागणीसाठी ग्रामपंचायतीला उपोषणाचा इशारा दिला होता. सुभाष नाईक यांच्याकडून उपोषणाचा इशारा मिळताच या प्रकरणाची नेरळ गावात जोरदार चर्चा सुरू झाली. तसेच, ग्रामपंचायतीने उभारलेली कचरा कुंडी कोणीही व्यक्ती विनापरवाना तोडू शकण्याची प्रथा सुरू झाली तर वेगळे वळण लागण्याची शक्यता निर्माण झाली होती. यामुळे सरपंच उषा पारधी आणि ग्रामविकास अधिकारी अरुण कारले यांनी दि.२५ सप्टेंबर रोजी कचराकुंडी तोडणारे घोडविंदे यांना नोटीस पाठवली आहे.

या नोटीसमध्ये ग्रामपंचायतीने ही कचरा कुंडी तोडण्याची कोणतीही परवानगी दिली नव्हती. यामुळे ही तोडण्यात आलेली कचरा कुंडी पूर्वी होती त्याच ठिकाणी स्व खर्चातून बांधून द्यावी, असे आदेश देण्यात आले आहेत. तसेच, कचरा कुंडी बांधण्याची कार्यवाही न केल्यास उचित कार्यवाही केली जाईल, असे देखील बजावण्यात आलेले आहे.

> **ग्रामपंचायतीकडून २५ सप्टेंबर रोजी आदेश देण्यात आले आहेत. मात्र, संबंधितांनी अद्याप कचरा कुंडी बांधण्याचे काम सुरू केलेले नाही. यामुळे ग्रामपंचायतीकडून तात्काळ या ठिकाणी कचराकुंडी बांधावी आणि त्याचा खर्च कचराकुंडी तोडणाऱ्यांकडून वसूल करावा. तसेच, ग्रामपंचायत अधिनियमानुसार कारवाई करावी.**
>
> **– सुभाष नाईक, तक्रारदार**




## स्मशानभूमी सुशोभिकरण लोकार्पण सोहळा

**। सोगाव । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील मुनवली येथील स्मशानभूमीच्या सुशोभिकरण कामाचा लोकार्पण सोहळा शुक्रवारी (दि.११) महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस पक्षाचे सचिव प्रविण ठाकूर व उपाध्यक्ष सुनिल थळे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

यावेळी माजी सरपंच उनीता थळे, चांदोरकर, माजी उपसरपंच समद कुर, चंद्रकांत खोत, संजय शिंदे, मुर्तुजा कुर, आत्माराम पंडम, बाळाराम थळे, गोविंद अनमाने, मधुकर सूद, दिलीप मोंढे, विवेक जोशी, सुरेश राऊत, सतिश घाडी, सचिन घाडी, रुस्तुम कुर, राजेंद्र घरत, सूचित थळे, संतोष बांद्रे, मनिष खाडे, शैलेश तिर्लोटकर, संजय अनमाने, अशोक मोंढे, रुपेश नागावकर, संदेश पाटील, राकेश पवार, गितेश ठकरुळ, नितेश ठकरुळ, सुयोग अनमाने, रोशन अनमाने, अनिल अनमाने, प्रविण घाडी, साहिल कुर, शबाब खान, विलास पाटील, अक्षय नागावकर, शिराज खान, जलील पठाण यांच्यासह मूनवली, सोगाव व पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्री-स्कूलमध्ये दसरा उत्साहात

**। उरण । वार्ताहर ।**

उरण एज्युकेशन सोसायटीस् लिटिल सिड्स इंटरनॅशनल प्री-स्कूलमध्ये शनिवारी (दि.१२) दसरा उत्साहात साजरा करण्यात आला. दरवर्षी दसऱ्याच्या दिवशी पूर्व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांना पाटीवर काढलेल्या सरस्वतीच्या चित्रावर फुले व हळदीकुंकु वाहून पाटीपूजा करण्यासाठी सांगितले जाते.



कार्यक्रमाच्या सुरवातीला पूर्व प्राथमिकविभागातीलएकाशिक्षिकेने दसरा का साजरा केला जातो, याची माहिती सांगितली. यानंतर संगीत शिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली एक सुंदरशी सरस्वती वंदना माध्यमिक विभागाच्या विद्यार्थांनी सादर केली. कार्यक्रमाच्या शेवटी शाळेतर्फे विद्यार्थी व पालकांना आपट्याच्या पानाच्या प्रतिकृती देऊन दसरा उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी डॉ. मिनाक्षी गुप्ता, स्कूल व ज्यु. कॉलेजच्या प्राचार्या, सि. कॉलेजच्या विभाग प्रमुख तसेच माध्यमिक, प्राथमिक, पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका, समन्वयक, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व पालक उपस्थित होते.

## विकास थळे यांचे निधन

**। नागोठणे । वार्ताहर ।**

कुर्डुस गावातील कबड्डीचा सहस्त्रपैलू झुंजार खेळाडू विकास पांडुरंग थळे यांचे मंगळवारी (दि.८) निधन झाले. त्यांच्या निधनाने कुर्डुस पंचक्रोशीत शोककळा पसरली आहे.



विकास थळे यांनी सुमारे चाळीस वर्षे कबड्डीवर अधिराज्य गाजवले आहे. महाराष्ट्राच्या प्रातिनिधिक संघातही त्यांची निवड झाली होती. विकास थळे यांचे उत्तरकार्य रविवारी (दि.२०) कुर्डुस येथील राहत्या घरी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.

# फायर आणि सेफ्टी काळाची गरज : जैन

**। नागोठणे । वार्ताहर ।**

इंजिनिअरिंगच्या प्रत्येक विद्यार्थ्याने भारतीय एज्युकेशन सोसायटीच्या वेलशेत येथील विद्या संकुलातील फायर अँड सेफ्टीच्या उपलब्ध कोर्सच्या संधीचा फायदा घेतला पाहिजे. प्रत्येक विद्यार्थी फायर आणि सेफ्टीचे शिक्षण घेऊनच बाहेर पडणे गरजेचे आहे. आपल्या संस्थेने २००९ रोजी सुरु केलेल्या फायर आणि सेफ्टी कोर्समुळे आज काही विद्यार्थी परदेशात गेले आहेत. तर, काहींना नोकरीत बढती मिळाली आहे. म्हणूनच इंजीनियरिंगमध्ये केवळ स्वतःची प्रगती न बघता इंजिनीअरिंग बरोबरच फायर आणि सेफ्टी कोर्स पूर्ण करणे ही इंजीनियरिंगच्या विद्यार्थ्यांसाठी काळाची गरज असल्याचे मत भाएसोचे अध्यक्ष किशोर जैन यांनी व्यक्त केले आहे.




नागोठण्यातील वेलशेत येथील भारतीय एज्युकेशन सोसायटीच्या विद्यासंकुलातील डिप्लोमा इंजिनीरिंग कॉलेजमध्ये फायर अँड सेफ्टी सेवा सप्ताह २०२४ निमित्ताने सुप्रीम पेट्रोकेमिकल्स आमडोशी -नागोठणे यांच्या सहकार्याने मार्गदर्शन व प्रात्यक्षिक शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जैन बोलत होते.

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून सुप्रीम पेट्रोकेमिकल हेल्थ अँड सेफ्टी विभागाचे प्रमुख एस.पी. यादव, संजय सोनावणे, प्रकाश जैन, विवेक सुभेकर, अनिल गिते, दीपक गायकवाड आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## पाचफुटी नागाला जीवदान

**। कोर्लई । वार्ताहर ।**

मुरुड तालुक्यातील खारआंबोली येथील रहिवासी संदीप ठाकूर यांच्या घरात पाचफुटी साप आढळून आला होता. त्यांनी तातडीने वनपाल किरण गायकर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सर्पमित्र संदीप घरत यांना माहिती दिली. संदीप घरत यांनी तात्काळ संदीप ठाकूर यांच्या घरी येऊन पाचफुटी नागाला पकडून वनअधिकारी मनोज वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली वनरक्षक किरण गायकर यांच्या सहकार्याने जवळील जंगलात सुरक्षितपणे सोडून जिवदान दिले आहे.

# रेल्वेच्या डब्यात विजयादशमी साजरी

**। डोंबिवली । प्रतिनिधी ।**

विजयदशमीच्या निमित्ताने दरवर्षी आपापल्या रेल्वेच्या डब्यात विजयादशमी सण जोरदार पद्धतीने साजरा केला जातो. यंदाही साई भजन मंडळ (डोंबिवली-दिवा) यांनी अति उत्साहीत आणि जल्लोषात साजरा केला. यावेळी वारकरी परंपरा जपत या मंडळाचे अध्यक्ष अंकुश बोरगे यांनी 'एक देश, एक गणवेष' असे दाखवून दिले.



यावेळी भजन मंडळाचे उपाध्यक्ष प्रदीप कदम यांनी भजनाच्या तालावर सर्वांना मंत्रमुग्ध करून परिसर दुमदुमून टाकला होता. यावेळी प्रदीप कदम, अंकुश बोरगे, विकास हळदवणेकर, उमेश घरवे, राकेश गायकवाड, प्रविण मेढेकर, विजय वर्दम, अशोक शिंदे, सचिन बेलकर, विनय विचारे, विजय बेलकर, दिपक कांबळे, प्रशांत नारकर, सुदर्शन सांगले, नितीन देवकर, दिंगबर बच्छाव, रवी फाटे आणि महिलांचा समावेश होता.

## महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

आंबिवली या ठिकाणी छ. शिवाजी महाराजांचे 'शिवस्मारक' होते. मात्र, या ठिकाणी सिंहासनावर विराजमान असलेले स्मारक असावे, अशी स्थानिकांची इच्छा होती. यासाठी शिवप्रेमींनी मा.आ. मनोहर भोईर यांच्याकडे मागणी केली होती. या मागणीची दखल घेत दसऱ्याच्या दिवशी या परिसरातील शिवभक्तांच्या उपस्थित लोकापर्ण सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी मा.आ. मनोहर भोईर, सरपंच दिपाली पाटील, प्रांजळ जाधव, राजेश पाटील, संतोष खांडेकर, गोरख रसाळ, नरेश पाटील उपस्थित होते.

# सुधागडमध्ये धम्म मेळावा संपन्न

**। पाली । वार्ताहर ।**

सुधागड तालुका बौद्धजन पंचायतच्यावतीने ६८व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त धम्म मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पाली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृहात सुधागड तालुक्यातील तमाम बौद्ध बांधव एकत्रित येत शनिवारी (दि.१२) धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा केला.

या दिवशी १९५६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली होती. तेव्हापासून विजयादशमीला धम्मचक्र प्रवर्तन दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त स्मारकामध्ये भंते विमल रत्ने यांचे प्रवचन आयोजित करण्यात आले होते.



यावेळी नितीन गायकवाड, भगवान शिंदे, मनोहर मोहिते, विजय जाधव, अभय गायकवाड, महेंद्र कांबळे, राजेश गायकवाड, नितीन जाधव, अमित गायकवाड, सुनील गायकवाड, दीपक पवार, रवींद्रनाथ ओव्हाळ, राहुल कांबळे, भीम महाडिक, आनंद जाधव, दिलीप मोरे, छनक शिर्के, दिलीप जाधव, नूतन शिंदे, वंदना गायकवाड, नीता कांबळे, अस्मिता कांबळे, कीर्ती कदम, प्रियंका ठवरे, श्वेता जाधव, वनिता शेलार आदी उपस्थित होते.

# बीज प्रक्रिया प्रात्यक्षिक कार्यक्रम

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील खांब येथे बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापिठ, अधिनस्त कृषी विज्ञान केंद्र रोहा मार्फत आणि कृषी महाविद्यालय दापोलीच्या ग्रामीण जागृती कार्यानुभव कार्यक्रम (रावे) अंतर्गत कार्यरत असलेल्या 'कृषी संजीवनी' गटातील कृषी दुतांकडून बीज प्रक्रिया प्रत्याक्षिक कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न करण्यात आला.



या प्रत्याक्षिकादरम्यान कृषिदूतांनी बीज प्रक्रियेचे महत्व सांगून बीज प्रक्रिया म्हणजेच बीजांचे संरक्षण करण्याची एक पद्धत आहे, जी मुख्यतः बीजांच्या आधीच्या शेतात लागवड करण्यापूर्वी केली जात असल्याची माहिती सांगितली. ब्राइन सोल्यूशन म्हणजेच पाण्यात मिठाचे (सोडियम क्लोराइड) मिश्रण या प्रत्याशिकासाठी डॉ. पेठे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. तसेच, कृषी विज्ञान केंद्रचे डॉ. मनोज तलाठी, डॉ.जीवन आरेकर यांचे देखील मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमात विभागातील महिला वर्गाने उत्स्फूर्तपणे सहभाग दर्शवून विविध बाबींची माहिती घेतली.

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **वर्कशॉपमध्ये मशिन ऑपरेटर आणि सुपरवाईझर** पाहिजेत शिक्षण १५ वी पास प्रशिक्षण दिले जाईल. ठिकाण बामणसुरे, चोंढी नंबर - ९१४५४५०२९७/९५७९२५८८९२.
- **वर्कशॉपमध्ये कामाला मुले पाहिजेत** १० वी १२ वी पास/नापास पगार १२००० रूपये १२ तास ड्युटी ठिकाण-बामणसुरे, चोंढी नंबर-९१४५४५०२९७/९५७९२५८८९२
- **दुकान गाळा भाड्याने देणे आहे** ४०५ चौ.फूट चेंढरे बायपास रोड ओम साई मोटर शेजारी फोन : ९९२१६४४१४४/९१७५७०८६०४ पाणी, संडास बाथरूम आतमध्ये उपलब्ध.
- **नागाव येथे कामासाठी बाई** ची आवश्यकता. घरकाम व मुलाला सांभाळणे. पगार- १२,०००/- संपर्क- ७८७५८६६५५५
- **अलिबाग एसटी स्टॅन्डजवळ** दुकान गाळा विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९
- **Freshers पाहिजेत** : रायगड जिल्ह्यातील अनअनुभवी / नवोदित पुरुष शिक्षकांना अलिबाग येथे पूर्ण वेळ नोकरीची संधी. पात्रता : BA / MA B.Ed, BSc / MSc B.Ed, B.E. / B.Tech पगार : रु. २०,०००/- पर्यंत. अर्ज करा- honestefforts1012@gmail.com
- **अलिबाग रेवस रोड येथे चायनीज/हॉटेल** त्वरीत स्वरूपात चालवायला देणे आहे. ७५०७३०१३५१, ९२७०४९८०९९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## निर्वाण दिडवानिया यांची सामाजिक बांधिलकी

# ग्रामीण समुदायांना सक्षम करण्याचा उद्देश

**। भाकरवड । वार्ताहर ।**

**अलिबाग तालुक्यातील शहाबाज येथील कोएसो माध्यमिक विद्यामंदिर शाळेत निर्वाण दीडवानिया यांनी आध्यावत सोलर भेट देऊन एक सामाजिक बांधिलकी जपली आहे. याचे सर्व श्रेय शाळेचे चेअरमन बाळू पाटील, संदेश बैकर, भूपेंद्र पाटील यांना देण्यात आले आहे. यापूर्वी पेढांबे येथील प्राथमिक आरोग्य केंद्र व चौकीचा पाडा येथील राजिप शाळेला देखील सोलर भेट देण्यात आलेला आहे.**




सोलारग्लाइड प्रणालीचे दूरदर्शी संस्थापक निर्वाण दिडवानिया यांनी केवळ नाविन्यपूर्ण सोलर सोल्यूशन्स स्थापित करूनच नव्हे तर नवीकरणीय ऊर्जेच्या संभाव्यतेचा उपयोग करण्यासाठी स्थानिक समुदायांना सक्षम बनवून ग्रामीण भारताच्या ऊर्जा परिदृश्यात क्रांती घडवली आहे. दिडवानिया यांचा विश्वास आहे की, जेव्हा लोकं त्यांच्या स्वतःच्या उर्जेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी साधने आणि ज्ञान या दोन्हींनी सुसज्ज असतात तेव्हा खरा बदल घडतो. नुकत्याच झालेल्या या उपक्रमात त्यांनी शालेय विद्यार्थ्यांना सौर ऊर्जेबद्दल शिक्षित करण्यावर लक्ष केंद्रित केले आणि त्यांना करिअरचा संभाव्य मार्ग म्हणून पाहण्यासाठी प्रोत्साहित केले.

दिडवानिया यांच्या मते, सौर ऊर्जा म्हणजे केवळ शक्ती नाही, तर ती समुदायांना स्वावलंबी होण्यासाठी ज्ञान आणि कौशल्ये प्रदान करणारी उर्जा आहे. यावेळी मुख्याध्यापक नितीन पाटील, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य जगदीश पाटील आदींनी निर्वाण दीडवाणीया यांचे आभार मानले.

### आम्ही भविष्य घडवतो...

**सोलारग्लाइड प्रणालीद्वारे दिडवानिया यांची दृष्टी वीज टंचाई दूर करण्यापलीकडची असून ग्रामीण समुदायांना स्वयंपूर्ण सक्षम ऊर्जा उत्पादक बनवण्याविषयी आहे. ग्रामीण भारतासाठी शाश्वत आणि सशक्त भविष्य निर्माण करण्याचा निर्धार असलेल्या भावनेला चैतन्यपूर्ण रूप देत दिडवानिया म्हणतात की, आम्ही फक्त वीज पुरवत नाही; तर आम्ही भविष्य घडवत आहोत.**

### सोलर प्रणालीचे प्रशिक्षण महत्वाचे

**स्थानिक रहिवाशांना सोलारग्लाइडची अनोखी सोलर ट्रॅकिंग सिस्टीम स्थापित आणि देखरेख करण्यासाठी प्रशिक्षण देणे हे निर्वाणच्या दृष्टिकोनाचा एक महत्त्वाचा पैलू आहे. जे दिवसभर सौर पॅनेलचे कोन अनुकूल करत असतात. या पारंपारिक प्रणालींपेक्षा ३५% जास्त ऊर्जा निर्माण करतात. शहाबाज येथील स्थानिक रणजित दिवकर घसवड यांना या सिस्टीम्स बसवण्यासाठी निर्वाणा दिडवानिया यांनी प्रशिक्षण दिले होते. त्यांच्या प्रशिक्षणापासून रणजित यांनी त्यांच्या उपजीविकेच्या संधींचा विस्तार करून अशा तीन प्रणाली यशस्वीरित्या स्थापित केल्या आहेत.**

# मांडवा जेट्टीवरील शेडचे पत्रे उडाले

## ■ गंजलेले लोखंडी बार खाली पडण्याची भीती; दुरुस्तीकडे मेरीटाईम बोर्डाचे दुर्लक्ष

। रायगड । प्रतिनिधी ।

**मांडवा जेटी पावसाळ्यात तीन महिने बंद होती. दरम्यान, वादळी वाऱ्यामुळे जेट्टीवरील लोखंडी पत्रे उडून गेले आहेत. मुंबईपासून जवळ व पर्यटकांचे आकर्षण असल्याने अनेकजण अलिबाग-मुरूडकडे जाण्यासाठी गेट वे ते मांडवा जलमार्गाने प्रवास करण्यास पसंती देतात. जलवाहतूक सुरू होऊन महिना उलटला तरी सोयी-सुविधांबाबत कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात न आल्याने महाराष्ट्र सागरी मंडळ प्रशासनाविरोधात पर्यटक तसेच प्रवाशांची तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.**




मुंबई गेट वे ते मांडवा-अलिबाग या जलमार्गावरील वाहतूक पावसाळ्यात सुरक्षेच्या कारणास्तव जून, जुलै व ऑगस्ट असे तीन महिने बंद करण्यात येते. यानंतर १ सप्टेंबरपासून वातावरणाचा अंदाज घेऊन महाराष्ट्र सागरी मंडळाच्या आदेशानुसार, या मार्गावरील प्रवासी जलवाहतूक सुरू करण्यात येते. गेल्या महिन्यात १ सप्टेंबरपासून जलवाहतूक सुरू करण्यात आली आहे; मात्र मांडवा जेट्टीवर देखभाल-दुरुस्तीकडे महाराष्ट्र सागरी मंडळ प्रशासनाकडून दुर्लक्ष होत आहे.

मांडवा जेट्टी ते वाहनतळ हे अंतर जास्त आहे, जेट्टीवर ये-जा करण्यासाठी असलेल्या मार्गावरील शेडचे गंजलेले पत्रे काढण्यात आले आहेत; मात्र ते पत्रे एक महिना होऊनही पुन्हा लावण्यात आलेले नाही. जेट्टीवरील प्रवासी वाहतूक बंद होती तेव्हाच शेडवर पत्रे टाकण्याचे काम होणे अपेक्षित होते. खाऱ्या पाण्यामुळे लोखंडी शेडचे काही खांब गंजले आहेत, त्यामुळे शेडवरील पत्रे किंवा लोखंडी वस्तू प्रवाशांच्या अंगावर पडून अपघात होण्याची शक्यता आहे.

जेट्टीवर काही ठिकाणी पत्रे उडून गेले आहेत तर काही ठिकाणी ते खिळखिळे झाल्याने केव्हाही पडून अपघाताची शक्यता असल्याने प्रवाशांना जीव मुठीत घेऊन मार्गक्रमण व्हावे लागते. मांडवा जेट्टी ते वाहनतळादरम्यान ये-जा करताना दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक, गर्भवती व आजारी रुग्णांच्या सेवेसाठी असलेल्या वाहनांची संख्या एक-दोन असून प्रवाशांची संख्या लक्षात घेता, ही संख्या अपुरी आहे. त्यामुळे प्रवाशांना सामानासह चालत जाताना मोठा मनस्ताप सहन करावा लागतो.



# पक्ष्यांच्या दुनियेत रमले विद्यार्थी

। महाड । वार्ताहर ।

आपल्या आजूबाजूला पक्ष्यांची किलबिल सुरू असते, त्यांची घरटे बांधण्याची घाई, गवत काडी उचलताना धडपड हे सगळे विद्यार्थी बघत असतात; परंतु अनेक पक्ष्यांची नावे कोणालाच ठाऊक नाहीत. याकरिता गावागावांतील विद्या संकुलात पक्ष्यांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन आयोजित करून सिस्केप संस्थेकडून नवीन पिढीला पर्यावरणाची ओळख करून देण्याचे काम अनेक वर्षे सुरू आहे. याच उद्देशाने रायगड शिक्षण प्रसारक मंडळ संचालित वरंध येथील शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयात जागतिक स्थलांतरित पक्षी दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

गिधाड संवर्धन एक आव्हान या विषयावर सिस्केपच्या महाड संस्थेचे अध्यक्ष प्रेमसागर मिस्त्री यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्या वेळी गिधाड संशोधन आणि संवर्धनाची माहिती देण्यात आली. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे राज्य शिक्षण पुरस्कारप्राप्त सेवानिवृत्त शिक्षक सुभाष शेठ, वरण माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक संतोष इनामदार उपस्थित होते. सिस्केप संस्थेच्या पक्षी वन्यजीव छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन या वेळी करण्यात आले.सह्याद्रीच्या कुशीत वसलेले वरंधगाव म्हणजे निसर्गाने मुक्त हस्ते वनसंपदेची केलेली उधळण आहे. गावाला आणि शाळेला लागूनच एक ओढा वाहतो. शाळेच्या परिसराची सुरुवातच डोंगररांगांनी होते. जंगलातील पशु-पक्ष्यांची चित्रे आणि त्यांची माहिती प्रदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सांगण्यात आली.

# महिलेच्या खात्यातून १२.७७ लाखांचा अपहार

। पनवेल । प्रतिनिधी ।

खारघरमध्ये राहणाऱ्या विवाहितेला अज्ञात सायबर चोरट्याने बँक खाते बंद करण्यात येत असल्याची भिती दाखवत तसेच केवायसी अपडेट करण्याबाबतची लिंक पाठवून त्याच्या बँक खात्यातून तब्बल १२.७७ लाखाची रक्कम परस्पर दुसऱ्या खात्यात वळती केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

खारघर पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात सायबर चोरट्याविरोधात फसवणुकीसह आयटी ॲक्ट नुसार गुन्हा दाखल करुन तपासाला सुरुवात केली आहे. सदर प्रकरणात फसवणूक झालेली ५२ वर्षीय विवाहिता खारघर, सेक्टर-२१ मध्ये कुटुंबासह राहण्यास आहे. १ ऑक्टोबर रोजी दुपारी १.४५ वाजण्याच्या सुमारास सदर विवाहितेला सायबर चोरट्याने ॲक्सिस बँकेचा कर्मचारी असल्याचे भासवून त्यांना संपर्क साधला होता. तसेच त्यांचे केवायसी अपडेट नसल्याचे सांगून केवायसी अपडेट करण्यास सांगितले. अन्यथा त्यांना ३५०० रुपये दंड भरावा लागेल आणि त्यांचे खाते बंद करण्यात येईल, अशी भिती दाखवली. त्यानंतर सायबर चोरट्याने या विवाहितेला केवायसी अपडेट करण्यासाठी एक लिंक सुध्दा पाठवून दिली. सदर लिंक उघडून विवाहितेने आपली संपूर्ण माहिती त्यात भरली. त्यानंतर सायबर चोरट्याने त्यांना २४ तासात त्यांचे खाते अपडेट होईल, असे सांगितले. त्यानंतर सायबर चोरट्यांनी या विवाहितेकडून घेतलेल्या माहितीचा वापर करुन दुसऱ्या दिवशी सायंकाळी त्यांच्या खात्यातून १२.७७ लाख रुपये दुसऱ्या खात्यात वळते करुन घेतले. याबाबतचे मेसेज विवाहितेच्या मोबाईलवर आल्यानंतर त्यांनी बँकेच्या कस्टमर केअर वर संपर्क साधला. त्यानंतर सायबर चोरट्यांनी त्यांच्या खात्यातून सदरची रक्कम दुसऱ्या खात्यात वळती केल्याचे आणि त्यामुळे त्यांचे खाते फ्रिज करण्यात आल्याचे त्यांना सांगण्यात आले. त्यानंतर या विवाहितेने प्रथम सायबर क्राईमच्या १९३० या हेल्पलाईनवर पार केली. त्यानंतर त्यांनी खारघर पोलीस तक्रार दाखल केली.

# पनवेल परिसरात अनधिकृत खाणावळींना उधाण

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल तालुक्यातसह शहर आणि सिडको वसाहतीत सध्या अनधिकृत खाणावळींना उधाण आले आहे. शासनाची परवानगी नसताना खाणावळी,हॉटेल मोठ्या प्रमाणात सुरू आहे. संबधीत खाणावळींवर कोणतीच कारवाई होत नसून त्याचा व्यवसाय तेजीत आहे. परिणामी एक प्रकारे बेकायदा व्यवसायांचा खत पाणीच घातले जात आहे.

परवाना प्राप्त मोजक्याच खाणावळी, रेस्टॉरंट व लॉजींग-बोर्डींग अस्तित्वात आहेत. खाणावळ, चहा, नाश्ता आदी खाद्य पदार्थ विक्रीच्या ठिकाणी पाण्यासाठी मातीचे माठ, सिमेंटचे टाके, प्लॉस्टिकच्या डब्यांचा वापर केला जात आहे. त्यात पाणी साठवून तेच ग्राहकांना दिले जाते. यातील कित्येक व्यावसायीक पाणी साठवून ठेवण्याचे साहित्य हे भांडी धुण्याच्या ठिकाणी ठेवतात. तेथे अत्यंत गलिच्छ वातावरण असते. हे ठिकाण घाणीच्या विळख्यात असते. तेथेच पिण्याचे पाणी ठेवून ते ग्राहकांना दिले जाते.

या अशुध्द पाण्यामुळे ग्राहकांचे आरोग्यच आता धोक्यात सापडले आहे. हा सर्व प्रकार संबंधित प्रशासन उघड्या डोळ्यांनी पाहात आहे. मात्र एकाही अनधिकृत खाणावळ व्यावसायीकाविरुद्ध कारवाई करण्यास प्रशासन धजावत नाही. कुठेही आणि कोणतीही खाणावळ सुरू करण्यापूर्वी खाणावळ चालकास अन्न व औषध प्रशासनाची परवानगी, संबंधित ग्रामपंचायत, पालिकेची परवानगी घेणे बंधनकारक असते. भाजी विक्रेत्यांकडून उरलेला, टाकाऊ भाजीपाला विकत घेवून अधिकचा नफा कमविण्याचा फंडा अनेक खानावळ चालक राबवत आहेत.

खारघर येथे मोठमोठ्या शिक्षण संस्था, कार्यालयामुळे शहरात खानावळींचा धंदा जोरात आहे. मात्र, या खानावळींची शासकीय दप्तरी स्वतंत्र नोंद नाही. खाद्यपदार्थाची गुणवत्ता, अस्वच्छतेचा प्रश्न गंभीर आहे. भर नागरी वस्तीत असलेल्या या खानावळींनी सुरक्षिततेचे नियम देखील धाब्यावर टाकले आहेत. पूर्वी केवळ येथील कामगार वर्ग आणि काही प्रमाणात विद्यार्थी वर्ग हा खानावळींवर अवलंबून असायचा. खानावळीसारख्या घरगुती व्यवसायातून अनेकांचे संसार उभे राहिले. मात्र, सध्या खानावळींना पूर्णतः व्यावसायिक स्वरुप आले आहे. त्यांच्यामध्ये तीव्र स्वरुपाची स्पर्धा आहे. त्यामुळे खाद्यपदार्थाच्या गुणवत्तेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

बेलापूर, खारघर, नवीन पनवेल येथे उच्च शिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्थांचा शहरातील वाढता पसारा त्याचबरोबर परगावातून आलेला कष्टकरी वर्ग खानावळींचा आधार घेत आहेत. त्यामुळे कोणी, केव्हा आणि कुठे खानावळ सुरू करावी याला काहीही नियम राहिलेला नाही.कोणतीही परवानगी घ्यायची नाही, नियम पाळायचे नाहीत. केवळ मयेथे खानावळ सुरू आहेफ, अशी पाटी लावून व्यवसाय सुरू केला जातो.

# गर्भवती महिलांना पोषण आहार आणि प्रथिने

**पनवेल :** रोटरी खारघर मिडटाऊनने खारघरमधील एका खेडेगावात २० टीबी रुग्ण आणि २० गर्भवती महिलांना पोषण आहार आणि प्रथिने पूरक आहार दान केले.हा कार्यक्रम जिल्हा क्षयरोग अधिकारी सचिन जाधव, क्लबचे अध्यक्ष आरटीएन शैलेश पटेल, प्रथम महिला दिपा पटेल, सेवा प्रकल्प संचालक आरटीएन डॉ. रविकिरण, आयपीपी आरटीएन अनुप गुप्ता आणि क्लबचे इतर वरिष्ठ सदस्य यांच्या उपस्थितीत पार पडला. या प्रकल्पाचा मुख्य हेतू म्हणजे गरजू क्षयरुग्णांना प्रथिनेयुक्त सप्लिमेंट्स आणि अन्नपदार्थ उपलब्ध करून देणे, जेणेकरून त्यांची पुनर्प्राप्ती जलद होईल. जिल्हा क्षयरोग अधिकारी सचिन जाधव यांनी रोटरी खारघरला असाच कार्यक्रम दर महिना ला ठेवा असा इच्छा जाहिर केली. रोटरी खारघर अध्यक्ष शैलेश पटेल यांनी हमी दिली की असा कार्यक्रम आम्ही सतत चालू ठेवायचा पूर्ण प्रयत्न करू.

## जाहीर सूचना

याद्वारे सूचित करण्यात येते की आमचे अशिल, श्रीमती अलिषा चीनाई यांच्याकडून मौजे झिराडपाडा, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील शेती भूखंड तसेच त्यावरील बांधकाम यामधील सर्व ते हक्क आणि हक्क संबंध खरेदीने घेण्याच्या विचारात आहेत ज्याचा तपशील सोबतच्या परिशिष्टात देण्यात आला आहे. (**सदरील मालमत्ता**)

अशी कोणतीही व्यक्ती जिचा सदरील मालमत्तेवर विक्री, विक्री करारनामा, तारण, अदलाबदल, भेट, वाटणी, लिन, भार, लीस, देखभाल, बिक्वेस्ट, वारसा, ट्रस्ट, ताबा, इजमेंट, भाडेपट्टा किंवा अन्य कोणत्याही माध्यमातून कोणताही दावा, हक्क किंवा हक्क संबंध किंवा हरकत आदी असेल तर त्यांनी त्या संदर्भातील माहिती लेखी स्वरूपात, निम्न स्वाक्षरीकार यांच्याकडे, त्यांच्या खालील प्रमाणे नमूद करण्यात आलेल्या पत्त्यावर आपल्या दाव्याच्या पुष्ठ्यर्थ आवश्यकता कागदपत्री पुराव्यांसह, ही सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून 14 दिवसात सादर करणे आवश्यक आहे अन्यथा अशा व्यक्तींचे दावे अधित्यजित आहेत, असे समजण्यात येईल.

**वरील संदर्भातील परिशिष्ट**
( सदरील मालमत्तेचा तपशील)

शेती भूखंड क्षेत्र 0-51-1 हेक्टर एयर्स गट क्रमांक 181, मौजे झिराडपाडा ( जुना गट क्रमांक 579 मौजे झिराड), मौजे झिराडपाडा तालुका अलिबाग जिल्हा रायगड तसेच त्यावर उभारण्यात आलेले बांधकाम ग्रामपंचायत झिराड घर क्रमांक 744, 744 ए, 821, 1104 आणि 1105 त्याच्या चतुसीमा पुढीलप्रमाणे.

उत्तर दिशेला किंवा त्या बाजूने : मालमत्ता गट क्रमांक 182 मौजे झिराडपाडा
दक्षिण दिशेला किंवा त्या बाजूने : मालमत्ता गट क्रमांक 155 मौजे झिराडपाडा
पूर्व दिशेला किंवा त्या बाजूनेः मालमत्ता गट क्रमांक 180 मौजे झिराडपाडा
पश्चिम दिशेला किंवा त्या बाजूनेः सार्वजनिक रस्ता

दिनांक 14 ऑक्टोबर 2024
एम मुल्ला असोसिएट्स
एडवोकेट्स अँड सोलिसिटर्स
ब्लॉक एफ 41, चौथा मजला
धनराज महल,
अपोलो बंदर
मुंबई - 400 001
ई-मेल :- maneck@mmassociates.in
mohini@mmassociates.in

# शैक्षणिक साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर फुलले हसू



। उरण । वार्ताहर ।

सेवा सहयोग फाऊंडेशन मुंबई यांच्याकडून जे.एम. म्हात्रे प्राथमिक शाळा, मोरा - उरण या शाळेतील पहिली ते चौथी पर्यंतच्या सर्व गरीब गरजू विद्यार्थ्यांना चालू शैक्षणिक वर्षी सेवा सहयोग फाऊंडेशनमार्फत ९२ स्कूल किट दप्तरे व शैक्षणिक साहित्य पेन्सिल, कंपास पेटी,वह्या, कलर बॉक्स, पाटी आधी साहित्यांचे वाटप करण्यात आले.

सेवा सहयोग फाउंडेशनचे पदाधिकारी सुषमा शिंदे, विशाल देसाई, दिपाली देवळे, आकाश गुप्ते, राम रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना मोफत दप्तरांचे वाटप करण्यात आले. या दप्तरांचे वाटप करण्यासाठी सेवा सहयोग फाऊंडेशन संस्थेचे प्रतिनिधी सुषमा शिंदे असिस्टंट मॅनेजर, स्वतः उपस्थित राहून विद्यार्थ्यांना दप्तराच्या किटचे वाटप केले.

प्राथमिक शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक साईनाथ गावंड यांनी आपल्या मनोगतातून म्हटले की, या शाळेमध्ये आज गरीब गरजू विद्यार्थी मोफत शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती व्हावी म्हणून वेगवेगळ्या प्रकारचे उपक्रम राबवले जातात. त्यापैकीच एक उपक्रम म्हणजे दप्तरे व शैक्षणिक साहित्याचा वाटप. हे वाटप सेवा सहयोग फाउंडेशन मुंबई या फाऊंडेशनने केल्यामुळे त्यांचे शाळेच्या वतीने आभार व्यक्त केले माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक माननीय सुधीर मुंबईकर यांनी आपल्या मनोगतातून सेवा सहयोग फाउंडेशन च्या कार्याबद्दल माहिती सांगितली व दप्तराचे किट देणाऱ्या फाऊंडेशनचे आभार व्यक्त केले. माध्यमिक शाळेचे वरिष्ठ शिक्षक मनोज म्हात्रे यांनी आपल्या मनोगतामधून सेवा सहयोग फाऊंडेशनच्या वेगवेगळ्या उपक्रमाबाबत पालकांना व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# चौघांविरोधात गुन्हा दाखल

**तळोजा :** सासरच्या जाचाल कंटाळून आत्महत्या केल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात पती, सासरे, सासू आणि नणंद यांच्या विरोधात भादवि कलम ३०६ नुसार ११ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. संगीता विकास यादव या महालक्ष्मी नगर, सेक्टर ९, नेरे येथे राहत असून त्यांचे पती रमेश यादव यांचे दुसऱ्या स्त्रीसोबत प्रेम संबंध असल्याने संगीता यांनी त्याला विचारणा केली. यावेळी रमेश यादव हा संगीता यांना मारहाण करायचा. तसेच चारही आरोपींनी संगीता हिला तिच्या वडिलांकडून चार चाकी वाहन घेऊन माग असे बोलून शारीरिक व मानसिक छळ केला. या त्रासाला कंटाळून संगीता यादव यांनी ९ ऑक्टोबर ते १० ऑक्टोबरच्या दरम्यान सिलिंग फॅनला ओढणीने गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी विकास रमेश यादव, रमेश मुन्नर यादव, सीता रमेश यादव, कविता रमेश यादव यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# ओएनजीसी उरणतर्फे दीक्षाभूमी येथे भोजनदान

। उरण । वार्ताहर ।

**ओएनजीसी उरण वतीने धम्मचक्र प्रवर्तन दिनानिम्मित दीक्षाभूमी, नागपूर येथे सलग १४ व्या वर्षी भोजनदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.**



११ आणि १२ ऑक्टोबर रोजी आयोजित केलेला हा कार्यक्रम बुद्धाच्या शिकवणींच्या तत्त्व- करुणा आणि सामुदायिक सेवा या भावनांशी सुसंगत होता. दीक्षाभूमी, नागपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी आपल्या लाखो अनुयायासह बुद्ध धम्माची दीक्षा स्वीकारली, या घटनेची मार्मिक पार्श्वभूमी म्हणून लाखो अनुयायी नागपूर येथे भेट देत असतात.

भोजन दान कार्यक्रमाची सुरुवात सकाळी अजनी जंक्शन रेल्वे स्थानकासमोरील स्टॉलवर ओएनजीसी अधिकारी, स्थानिक मान्यवर आणि समाजातील सदस्यांच्या उपस्थितीत झालेल्या औपचारिक मेळाव्याने झाली. कार्यक्रमासाठी एन अशोक बाबू, हेडसामग्रीव्यवस्थापन, ओएनजीसी उरण, धीरज उमरेडकर, हेड वित्त विभाग, ओएनजीसी मेहसाणा, गौरव पतंगे, मॅनेजर एचआर ओएनजीसी उरण; विष्णु व्हटकर, अध्यक्ष - एससी एसटी वेल्फेअर असोसिएशन, ओएनजीसी उरण, निशिकांत वलादे, सेक्रेटरी- एससी एसटी वेल्फेअर असोसिएशन, ओएनजीसी उरण, विश्वास लोखंडे, सीइसी मेंबर एससी एसटी वेल्फेअर असोसिएशन, ओएनजीसी उरण आणि इतर मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली. कार्यक्रमाअंतर्गत सुमारे १५०० किलो नाश्ता आणि सुमारे ४५०० किलो जेवणाचे पाहुण्यांना वाटप करण्यात आले. दीक्षाभूमीवर आलेल्या २६,००० हून अधिक यात्रेकरूंनी ओएनजीसी आयोजित भोजन दान कार्यक्रमाचा लाभ घेतला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री गौतम कदम यांच्यासह ३० हून अधिक ओएनजीसी कर्मचाऱ्यांनी दिवसरात्र अथक श्रमदान केले. भोजन दानाचा हा कार्यक्रम सामाजिक जबाबदारी आणि समाजाच्या कल्याणासाठी ओएनजीसीच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. ओएनजीसी उरणच्या उपक्रमाचा उद्देश केवळ पोषण प्रदान करणे नव्हे तर एकता वाढवणे आणि सहानुभूती आणि दयाळूपणाचा संदेश प्रसारित करणे हा आहे. देशाच्या कोन्याकोपऱ्यातून लांब प्रवास करुन थकून आलेल्या गोरगरीब भाविकांनी पोटभर जेवणाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली, आणि ओएनजीसीचे आभार मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्लांट हेड ओएनजीसीदेवेंद्र कुमार त्रिवेदी, हेड एचआर ओएनजीसी उरण भावना आठवले, मनीष मेहता, हेड वित्त विभाग ओएनजीसी उरण यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

## MAHATRANSCO e-TENDER NOTICE –

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e- Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-43/ 24-25 7000032727 | Overhauling of Siemens make EHV breakers under EHV (O&M) Circle, Panvel. Tender Fee **Rs. 500/- +GST** | **Rs.99.02 Lakhs** |
| Tend-49/ 24-25 7000033995 | AMC for attending oil leakage from various joints of EHV power TF / ICT at various substation under EHV (O&M) Circle, Panvel. **Tender Fee Rs. 500/- +GST** | **Limited to Rs.50.00 Lakhs** |
| Tend-53/ 24-25 7000034065 | Providing and fixing of universal name plate to D/C & M/C towers for various EHV lines under EHV lines maintenance S/Dn. Padgha - I & Padgha - II under EHV (O&M) Dn. Dombivali under EHV (O&M) Circle, Panvel. **Tender Fee Rs. 500/- +GST** | **Rs.37.98 Lakhs** |

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 11.10.2024 to 18.10.2024 up to 11:00 hrs**, **Opening date:-18.10.2024 @ 11:30 Hrs.** For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/Contact Person: The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9769006131.
E-mail ID se7200@mahatransco.in

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या नोटीसने सूचित करण्यात येते की, आमचे अशील हे खालील वर्णनाच्या मिळकतीचे विद्यमान मालकाकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणे आमचे अशील व मिळकतीचे मालक यांच्यामध्ये सुरु आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**पत्ता मौजे-कुडतुडी, ता.म्हसळा, जि.रायगड**

| क्र. | गट नं. | एकूण क्षेत्र | मालकाचे नाव | प्रकार |
|---|---|---|---|---|
| १. | १५३ | ७.७१.०० पैकी १.५४.२० | रेश्मा रमेश कासार रमेश महादू कासार | गवत पड |

तिचे कोणतेही भागावर, विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, वारसा हक्क, विक्रीचा करार लीज, चार्ज, पोटगी, वहिवाट, इजामेन्तरी या अथवा कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध असल्यास अथवा कोणत्याही स्वरुपात सदर मिळकतीची विक्री व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी हरकत अथवा तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ५ पाच दिवसाच्या आत सही करणार यांचेकडे लेखी स्वरुपात कागदपत्रासहित सादर करावे. मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्भेद आहे असे समजून आमचे अशील व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कोणाचीही हरकत तक्रार असल्यास ती विचारात घेतली जाणार नाही.

माणगाव
दि. १३/१०/२०२४

Adv.yogesh Jayant gangam
L.L.B.high court
ADVOCATE
ऑफिस पता:- M Lee aprt.,,ground floor, hari pandav path, uran,navi Mumbai 400702, mob: 9869993446













## मान्यवरांचे जल्लोषात स्वागत

महिला संवाद मेळावा आयोजित करण्यात आला. या मेळाव्याला हजारोच्या संख्येने महिलांनी गर्दी केली होती. चित्रलेखा पाटील यांच्यासह अन्य मान्यवरांचे कार्यक्रमाच्या ठिकाणी आगमन होताच, फटाक्यांची आतषबाजी, फुलांचा वर्षाव करीत उभे राहून महिलांनी त्यांचे स्वागत केले. सुरुवातीला प्रवेशद्वारासमोर औक्षण करण्यात आले. यावेळी पारंपारिक वाद्य खालू बाजाच्या वाद्याने मिरवणूक काढण्यात आली.

# जुलमी सरकारला महिलाच जागा दाखविणार : साम्या कोरडे

मागील अडीच वर्षात सरकारला लाडक्या बहिणी दिसल्या नाहीत. परंतु, मागील काही दिवसांपासून बहिणींची आठवण झाली आहे. आगामी निवडणूक डोळ्यासमोर ठेवून लाडकी बहिण योजनेमार्फत पैसे देऊन मते मिळविण्याचा डाव सुरू आहे. मते मिळविण्यासाठी अमिष देणाऱ्या या सरकारने दुसऱ्या बाजूला कांदा, बटाट्यासह दैनंदिन व्यवहारातील वस्तूंमध्ये भरमसाठ वाढ केली आहे. या जुलूमी सरकारला महिलाच जागा दाखविणार आहेत, असे प्रतिपादन शेकाप राज्य विद्यार्थी संघटनेच्या अध्यक्षा साम्या कोरडे यांनी केले.

पुढे त्या म्हणाल्या, छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात शेतकरी, महिलांचा सन्मान केला जात होता. कोणत्याही प्रकारचे जूलमी कर लावले जात नव्हते. परंतु, या जूलमी सरकारच्या काळात जीएसटी व इतर कर लादून सर्वसमान्यांची लूट केली जात आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त झालेत आहेत. अलिबाग रोहा



मार्गावरील रस्त्याची अवस्था बिकट आहे. या अडीच वर्षात आमदारांनी काय विकास केला असा प्रश्न विचारला जात आहे. बदलापूर, उरणसारख्या घटनेमुळे महिलांमध्ये असुरक्षितता निर्माण झाली आहे. निवडणूकीच्या तोंडावर अनेकांचे पगार अडवले आहेत. पेंशन थांबविली आहे, असा आरोप कोरडे यांनी केला. आगामी काळात आपले सरकार आणण्यासाठी तसेच चित्रलेखा पाटील यांना आमदार म्हणून विधान सभेत पाठविण्यासाठी तयार व्हा, असे आवाहन त्यांनी केले.

## स्व. मीनाक्षी पाटील यांना श्रध्दांजली

रायगड जिल्हा महिला बचतगट फेडरेशन पुरस्कृत महिला मेळावा भरविण्यात आला. या मेळाव्याच्या दरम्यान शेकापच्या नेत्या, रायगडच्या रणरागिणी, बुलंद आवाज माजी राज्यमंत्री स्व.मीनाक्षी पाटील यांना सर्वांनी उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. तसेच उद्योजक रतन टाटा आणि विभागातील शेकाप कार्यकर्ते अश्वीन भोपी यांनादेखील यावेळी श्रध्दांजली अर्पण केली. तसेच सानेगुरुजी विद्यालयातील दिनाभाई मोरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून मान्यवरांकडून अभिवादन करण्यात आले.











## महिलांचा सन्मानपत्र देऊन गौरव

महिला संवाद मेळाव्याच्या निमित्ताने पंचक्रोशीतील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला. राजकीय, शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक व्यवसायिक अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विभागातील तीसहून अधिक महिलांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

# भारताने केला बांगलादेशचा सुपडासाफ

। मुंबई । वृतसंस्था ।

भारतीय संघाने तिसऱ्या टी-२० सामन्यात बांगलादेशचा १३३ धावांनी पराभव केला. यासह टीम इंडियाने मालिकेत ३-० असा क्लीन स्वीप केला. या विजयाच्या जोरावर भारताने पाकिस्तानचा मोठा विक्रम म ोडीत काढला आहे. भारताने वर्ष २०२४ मध्ये आतापर्यंत एकूण २१ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने जिंकले



आहेत. त्यामुळे भारताने एका वर्षात सर्वाधिक सामने जिंकण्याच्या बाबतीत पाकिस्तानला मागे टाकले आहे.

तिसऱ्या टी-२० सामन्यात संजू सॅमसनने शतक लावले, तर सूर्यकुमार यादवने उत्कृष्ट अर्धशतक झळकावले. हार्दिक पंड्यानेही तुफानी खेळी केली. ज्यामुळे भारताने बांगलादेशला २९८ धावांचे लक्ष्य दिले होते. प्रत्युत्तरात बांगलादेशचा संघ निर्धारित षटकात ७ बाद १६४ धावा करु शकला. पाकिस्तानने २०२१ मध्ये टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एकूण २० सामने जिंकले होते. भारतीय संघाला या वर्षी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध अजूनही चार टी-२० सामने खेळायचे आहेत. जरी संघाने सर्व सामने जिंकले तरी ते युगांडाचा विश्वविक्रम मोडू शकणार नाहीत. टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एका वर्षात सर्वाधिक सामने जिंकण्याचा विक्रम युगांडाच्या संघाच्या नावावर आहे. युगांडाने २०२३ साली टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एकूण २९ सामने जिंकले होते. टीम इंडियाने २०२२ मध्ये २८ सामने जिंकले होते. यंदाही भारतीय संघ चांगली काम गिरी करत असून एकापाठोपाठ एक नवीन विक्रम करत आहे. भारताने विजेतेपद जिंकले. भारतीय संघाने एकही सामना गमावला नव्हता.

# नवोदित संघ, शिवमुद्रा प्रतिष्ठान कुमार गटाच्या अंतिम फेरीत

## शिवनेरी सेवा मंडळ आयोजित ५६ वां कबड्डी महोत्सव - २०२४

। मुंबई । वृतसंस्था ।

नवोदित संघ, शिवमुद्रा प्रतिष्ठान यांनी शिवनेरी सेवा मंडळाने आयोजित केलेल्या कुमार गट कबड्डी स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक दिली. विशेष व्यावसायिक गटात गतविजेत्या भारत पेट्रोलियम सह इन्शोअर कोट, न्यू इंडिया एन्शो; रिझर्व्ह बँक यांनी उपांत्य फेरी गाठली. दादर(पूर्व) शिंदेवाडी येथील भवानीमाता क्रीडांगणावर सुरू असलेल्या कुमार गटाच्या उपांत्य सामन्यात नवोदित संघाने काळाचौकीच्या अमर मंडळाला ४३-२६ असे सहज नमविले.



पहिल्या डावात २४-०८ अशी भक्कम आघाडी घेणाऱ्या नवोदितने दुसऱ्या डावात सावध खेळ करीत आपला विजय साकारला. अथर्व, सुवर्णा, शौर्य धुरी यांच्या चतुरस्त्र खेळाला या विजयाचे श्रेय जाते. दुसऱ्या डावात अमरच्या रोहित शिंदेने कडवी लढत देत पराभवतील अंतर कमी केले. दुसऱ्या उपांत्य सामन्यात शिवमुद्रा प्रतिष्ठानने विजय क्लबवर ३५-१४ अशी लीलया मात केली. विशाल लाड, आर्णव हातकर यांच्या पूर्वार्धातील झंझावाती खेळाने शिवमुद्राने विजयवर २८-०१ अशी महत्वपूर्ण आघाडी घेतली. उत्तरार्धात विजयच्या आरिफ शेखने बऱ्यापैकी प्रतिकार करीत यश मिळविले. पण संघाचा पराभव टाळण्यात तो अपयशी ठरला. विशेष व्यावसायिक गटाच्या उपांत्यपूर्व सामन्यात भारत पेट्रोलियमने युनियन बँकेचा २६-१४ असा पराभव केला.

# दसऱ्याच्या मुहूर्तावर कबड्डीचा नारळ फुटला



। पाली/गोमाशी । वार्ताहर ।

थोड्या दिवसात सराईचा हंगाम सुरू होईल त्यानंतर शेती रिकामी झाली की सर्वत्र कबड्डीचा हंगामाला सुरूवात होते.रायगड जिल्हा हा कबड्डीची पंढरी म्हणून ओळखली जाते. गावोगावी, तालुका, जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा खेळविण्यात येतात.

कबड्डीचा हंगाम सुरू होण्यापूर्वी गोमाशी येथे दसऱ्याच्या मुहूर्तावर कबड्डीच्या मैदानाची सजावट करून कबड्डीचा सराव करण्यापूर्वी नारळ वाढविण्यात आला. यावेळी सोमजाई माता मंडळाचे खेळाडू, नवतरुण, ग्रामस्थ मंडळी ,पदाधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते.

## शारदा मंदिर शाळेच्या नऊ खेळाडूंची

# राज्यस्तरीय स्पर्धेत निवड



। कर्जत । वार्ताहर ।

तालुक्यातील नेरळ येथे झालेल्या जिल्हास्तरीय ॲथलिट माथेरान वेली स्पर्धेत शारदा विद्या मंदिरच्या नऊ खेळाडूंनी सुवर्णपदक पदक आणि रौप्यपदकाची कमाई केली. पुणे येथे होणाऱ्या अथेलिट स्पर्धेत त्यांची निवड झाली आहे.

शारदा विद्या मंदिरच्या खेळाडूंनी यश प्राप्त करून स्वतःचे व शाळेचे नाव उज्वल केले असून या यशस्वी खेळाडूंच्या यशामुळेच रायगड जिल्ह्याला संपूर्ण महाराष्ट्रात प्रथम क्रमांकाचा मान मिळाला आहे. या यशस्वी खेळाडूंचे महाराष्ट्र आर्मी असोसिएशनचे अध्यक्ष व सचिव आत्तर यांनी कौतुक करून राष्ट्रीय स्पर्धेत निवड झाल्याचे जाहीर केले व शुभेच्छा दिल्या. या यशस्वी खेळाडूंच्या यशामागे शारदा विद्या मंदिर शाळेचे शारीरिक शिक्षण शिक्षक सौरभ गुरव यांचे मोलाचे प्रशिक्षण लाभले आहे.

मधुरा घुडे-२ सुवर्ण, श्रावणी बडेकर-२ रौप्य, गुजन ठाकूर-१ रौप्य, मंदिका प्रसाद-१ सुवर्ण, प्राजक्ता खडके-१ सुवर्ण, सुमित चौधरी-३ रौप्य, नैतिक गोरे-२ रौप्य, सहबान शेक-२ सुवर्ण, १ रौप्य, भावेश बोराडे-१ सुवर्ण, २ रौप्य रायगड जिल्हा सचिव स्वप्नील अडुरकर व मोहिनी अडुरकर यांनी कौतुक करून शुभेच्छा दिल्या. तसेच शाळेचे मुख्याध्यापिका व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)